# लावण्यगीते



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४२३

REFBK-0023018

जगदीश खेबुडकर

# लावण्य गीते

जगदीश खेबुडकर



□

मुद्रक
रवि बेहेरे
रविराज प्रिंटरी
६३४, बुधवार पेठ, पुणे २

□

प्रथमावृत्ती
सप्टेंबर १९८०

□

© जगदीश खेबुडकर

□

मुखपृष्ठ व आतील चित्रे
जोशी आर्टस


□

प्रकाशक
रवि बेहेरे
अस्मिता प्रकाशन
४५८।२ सदाशिव पेठ, पुणे ३०

□

मूल्य : पंधरा रुपये





# लावण्य गीते

जगदीश खेबुडकर

REFBK-0023018







# १ लवंगी मिरची (रंगल्या रात्री अशा)

नाव गाव कशाला पुसता,
आहो मी आहे कोल्हापुरची
मला हो म्हणतात लवंगी मिरची ।। धृ ।।

हा डौल झोक हा नटारंगीचा ढंग,
वाऱ्यावर लवते जशी चवळीची शेंग,
हर घडीला नखरा नवा… डोळा हो डावा,–
झाकुनी फेकिन नजरेची बरची ।। १ ।।

हा लाल डाळिंबी पदर शालु जरतारी,
ही हिरवी हिरवी चोळी तंग भरदारी,
नका पाहू न्यहाळुन अशी…पडाल तुम्ही फशी–
जणू मी नागिन झाडावरची ।। २ ।।

या तिखटपणावर जाऊ नका हळहळुन,
घायाळ शिकारी हरिणी जाईल पळुन,
हिरव्या रानात दिसते उठून…नका घेऊ खुडुन–
अहो मी राणी माझ्या घरची ।। ३ ।।




## २ मसाल्याची पानपट्टी (रंगल्या रात्री अशा)

लाडी नको गोडी नको,
चंदेरी साडी नको,।
मुलखाची मी हट्टी,
आणा हो मला मसाल्याची पानपट्टी ॥ धृ ॥

चुना कोल्हापुरी, पान सातारी घ्या,
कात पांढरा नि दगडी सुपारी घ्या,
घाला केशर, कस्तुरी, चमन जरा,
अन् जमवा सारी भट्टी ॥ १ ॥

सोन्या चांदीला फसायची न्हाई मी,
लाडी गोडी लावून हसायची न्हाई मी,
करा मोल प्रितीचं, कुणासाठी मी–
केला आटापिटा ॥ २ ॥

ही मागणी माझी ऐकाल का,
ही हौस राणीची पुरवाल का,
नाही बोलणार मी बारा वरसं,
फू फू तुमची गट्टी ॥ ३ ॥



## ३ फोटू (रंगल्या रात्री अशा)

तरुणपणीचं कौतुक करूनी,
किती नटू मी किती नटू,
धनि तुमचा नि माझा एक काढा फोटू ॥ धृ ॥

करा थाट तुम्ही सरदारी,
अशी बशिन तुमच्या शेजारी,
सांगा कशी मी हसू राजसा,
सांगा कोणता डोळा मिटू ? ॥ १ ॥

ओठ लाल, गुलाबी गाल,
मान तिरपी, पदराचा कौल,
नवी नवरी मी अशी लाजरी.
चला नवतिचा रंग लुटू ॥ २ ॥

राजा राणीला चौकट कसली,
मैना राघूच्या पिंजऱ्यात बसली,
मैना गाईल गीत पिरतीचं,
पोपट गाईल विठू विठू ॥ ३ ॥



## ४ विडा रंगला लाल (सवाल माझा ऐका)

कुणी चुरडलं फूल गुलाबी, कसा रंगला गाल ?
कसा ग बाई, विडा रंगला लाल ? ॥ ध्रृ ॥

कुंवार पण मज घाली उखाणा,
लाज छेडिते, नवा तराणा,
फेर धरूनी नाचू लागले, औंदाचं ग साल ॥१॥

सहज अंगणी होतें बसले,
मनात माझ्या कोणी हसले,
वेळ साधूनी कोन्या मधुनी,
चकचुकली गं पाल ॥२॥

नकळत सारी किमया घडली;
जादूगिरी ही मला न कळली,
कुणी उधळली रंगपंचमी
माझ्यावरती काल ॥३॥



## ५ वसंतसना (सवाल माझा ऐका)

पावसात उभी जलपरी, मदन मंजिरीं,
सजुन साजरी, मूर्ति लाजरी
डोळ्यामधी ठसली,
मला वसंत सेना दिसली. ।। ध्रृ. ।।

जणु पारिजाताच्या सरी पडती डोईवरी
चैताची गौरी दारात,
नेसली साडी भर्जरी, तलम पांढरी,
कांचली निरी, दिसली झोकात
केसातून ओल्याचिंब, निथळती थेंब,
शहारे अंग, चोळी दंडात, लपेटून बसली,
मला वसंतसेना दिसली. ।।१।।

नारी बघुन भुललो मनी, भान हरपूनी
अंगाअंगातूनी लहरली वीज,
दिन रात्री सुदबुध गेली, चैन सांडली,
ओढ लागली, उडाली नीज,
तुझ्यापुढे ही शरणांगती, गुंगली मती,
जशी का कविता कविवर रूसली,
मला वसंतसेना दिसली. ।।२।।

अन् ज्याचं त्यानं समजून घ्यावं,
मनाला ठावं कसं बोलावं,
नारीची जात.
शब्दाविण मी बोललो, तू ही ऐकले,
प्रीत आज फुलली अंतरंगात,
दोघात एक भावना, कशी तुजं पुन्हा सांगू साजणा,
आज ही खुण खुणेला पटली,
मला वसंतसेना दिसली. ।।३।।

## ६ सोळावं वरीस धोक्याचं ( सवाल माझा ऐका )

तरूणपणाच्या रस्त्यावरचं पहिलं ठिकाण नाक्याचं.
सोळावं वरीस धोक्याचं ग,
सोळावं वरीस धोक्याचं ।।ध्रु.।।

शिळ घालता मदनानं, झाली जवानी बेभान
जागोजागी उभी शिकारी, मचान बांधून मोक्याचं,
सोळावं वरीस धोक्याचं ।।१।।

रात रूपेरी फुलली गं, मला पौर्णिमा भुलली गं,
अंगावरती सांडू लागले, टिपूर चादणं रुप्याचं
सोळावं वरीस धोक्याचं ।।२।।

पिसाट वारा मदनाचा, पतंग उडवी पदराचा.
तोल सुटावा वेळ अशी ही, तरी चालणं ठेक्याचं.
सोळावं वरीच धोक्याचं ।।३।।

ओढ लागली संगतीची, नजर भेटीच्या गमतीची
आज मला हे गुपित कळलं, जत्रेमधल्या धोक्याचं.
सोळावं वरीस धोक्याचं ।।४।।



## ७ कसं काय पाटील बरं हाय का (सवाल माझा ऐका)

कसं काय पाटील बरं हायका ?
काल काय ऐकलं ते खरं हाय का ? ।।धृ.।।

काल म्हनं तुम्ही जत्रेला गेला,
तमाशात काळीज इसरून आला,
इसरल्या ठायी गावलं का न्हाई,
आज तरी संगती आनलय का ? ।।१।।

काल म्हनं तुम्ही तालुक्याला गेला,
कमरेचा ऐवज हरवून आला,
केली वाटमारी, सांजच्या पारी.
आज काय शिल्लक ऱ्हायलं का ? ।।२।।

काल म्हनं तुम्ही हितं-तिथं गेला,
अन् बघता बघता घोटाळा झाला,
झालं काय पुढं, सांगा तरी थोडं,
खाली नका बघू आता लाजताय का ? ।।३।।



## ८ लागुदे उसाला कोल्हा ( केला इशारा जाता जाता )

खुशाल लागुदे कोल्हा उसाला,
हुसकून लावू नका,
थांबवू नका तुम्ही थांबवू नका,
गुऱ्हाळ थांबवू नका. ।।ध्रु.।।

का हो कोल्हयाची धरताय भिती,
खाऊन खाऊन त्यो खाईल किती,
तासा तासाला मांदाण भरू दे,
काहील लांबवू नका. ।।१।।

तुम्ही गावचं फडकरी मोटं,
राखून ठेवा हो कोल्हयापुरतं,
रंगल्या उसाची मोजणी कराया,
गावकरी जमवू नका. ।।२।।


पीक तरारून आलय औंदा,
सौद्यावरती ठरू दे सौदा
कोल्हेकुईला भिऊन साजणा,
व्यापारी गमवू नका. ।।३।।

## ९ नाव सांगा ( केला इशारा जाता जाता )

राम राम पावणं तुम्ही नाव सांगा.
कायमचा पत्ता अन् गाव सांगा ॥ध्रृ.॥

रोखून बघता हे बरं नव्हं
चारचौघात हे खरं नव्हं,
अनमान का आता खुशाल बसा,
तुमच्या मनातला भाव सांगा ॥१॥

फेऱ्या का घालता हो दारावरून,
अन् चोरून बघता मागं वळून
लपाछपी का ही शिवाशिवी,
कोनचा खेळ ह्यो नाव सांगा ॥२॥



हमरस्त्यामधी तुम्ही शीळ घालता,
शुक-शुक करून बोलाविता—मला बोलाविता.
अल्याड आई, पल्याड बाबा,
तुमच्या संग कशी येऊ सांगा ॥३॥

किती किती मी सांगू तिन तिनदा,
तुमच्यावर मी हो झाले फिदा,
काय बाई तरी नी काळजावरी,
कसा घातला घाव सांगा ॥४॥

## १० बांधा एक डोरलं ( केला इशारा जाता जाता )

लाखामधूनी सख्या तुम्हाला अचूक मी हेरलं,
तुमच्या नावानं गळ्यांत बांधा एक डोरलं ।।ध्रु.।।

ही ऐन भराची उमर लई मोलाची
ही चिक्कण माती सोन्याच्या मोलाची
अंगामधुनी पिसाट वारं ज्वानीचं भरलं ।।१।।

हे घुंगरू बांधण्या कितीदा खाली वाकू,
किती किती लाज मी पदराखाली झाकू,
चाळामधूनी वीज पाखरू, मनात थरथरलं ।।२।।

दोघात रंगला नजरबंदीचा खेळ,
पण हार जीतीचा बसला नाही मेळ,
बक्कळ झाल्या भेटी आता एक काम उरलं. ।।३।



## ११ चोरून बघतोय मेला (केला इशारा जाता जाता)

नाव गाव इचार जा त्याला,
कसा चोरून बघतोय मेला ।।धृ.।।

दार लाऊनी होते मी न्हात
आजुबाजूला कोणी नव्हतं,
अशी चोळत होते पाठ
अन् हळूच खिडकीत आला ।।१।।

गेले होते मी जतरंमंदी
याला कशी ग लागली वर्दी,
गर्दी बघुन साधली संधी
धक्का दंडाला मारून गेला ।।२।।

काय धक्क्यात जादू भरली
जशी अंगात बिजली शिरली,
सुरी नजरेची उरात शिरली
तुकडा काळजाचा काढून नेला ।।३।।

काय होतय ते सांगू कशी
राग वरचा नी आतली खुशी,
कुठल्या कुठं मी पडले फशी
डाव्या डोळ्यानं घोटाळा केला ।।४।।

## १२ घ्यावा गोविंद विडा (केला इशारा जाता जाता)

ही नव्या नवतीची खुडून कवळी पानं,
लावला ज्वानीचा चुना मधल्या बोटानं,
ही चिकनी सुपारी फोडली चिमण्या दातानं,
अन् डाव्या डोळ्यानं खुडून घातला,
नजर कातांचा हो खडा,
राजसा घ्यावा गोविंद विडा ।।ध्रृ.।।

विडा घेऊनी अलगद हाती
हात अदबीनं केला पुढती,
हिरवा शालू, हिरवी चोळी,
भरला हिरवा चुडा ।।१।।

या विड्याचा रंग गुलाबी,
धुंद करील ही नशा शराबी,
याच नशेचा तुमच्यासाठी,
भरून आणला घडा ।।२।।

नाच नाचुनी होता दंग,
अर्ध्या रात्री येईल रंग,
तुमच्यावरती उधळीन राया.
शिणगारांचा सडा ।।३।।


# १२ घोटाळा (गणगौळण)

भरल्या जत्रत घोटाळा घडला,
माझ्या जोडव्याचा जोड कुठं पडला ।।ध्रृ.।।

होती मायंदाळ गर्दी भवती,
मला सुदबुध कसलीच नव्हती,
कुणी चालत होता संगती,
जीव त्याच्या रूपावर जडला ग, ।।१।।

जात होते मी घाई घाईनं.
टक लावून बघितलं त्यानं,
मी हळूच वळविली मानं,
त्याच्या डोळ्याला डोळा भिडला ग ।।२।।,

वाक वाकून किती गं शोधलं,
काय झालं ते मला न्हायी कळलं,
कुणी मनात अवचित भरलं,
माझ्या मनाचा तोल मग गेला गं ।।३।।



## १४ मराठी मातीची लावणी (गणगौळण)

चल म्हमईला जाऊ नारी
कली युगाच्या माया बाजारी, इंद्र दरबारी,
दरबारी ग जाऊ, बालेघाटी लावणी गाऊ,
अशी ग मुंबई ऽ ।।ध्रृ।।

अशी म्हमईची तऱ्हा, न्हायी मराठीला थारा,
अठरा पगड जातीचा मेळा, घरचा मालक परका झाला,
परक्या पावन्यानं गुत्तापा केला,
दुसऱ्याचं खरकटं काढून वरती, हात जोडून फुडं उभा ऱ्हाती,
असं लाचार झालं जीणं, मराठी मनं गुदमरून जाती,
आपलीच राजधानी अशी, नको पडू फशी,
माघारी जाऊ, बालेघाटी लावणी गाऊ,
अशी ग मुंबई ऽ ।।१।।


उभा पाठीशी अजिक्य तारा, मावळ डोंगर दरी,
नार भी साताऱ्याची खरी ।।

नाचात झाले मी दंग, ज्वानीचा रंग गालावर चढला,
देहभान हरपलं, पदर वाऱ्यावर उडला,
चंद्रावळीची फुगडी सांडली, ह्याच वाटेवरी,
नार मी साताऱ्याची खरी ।।

मैत्रिणी, स्वरूप चैत्रिणी, कोमल गात्रिणी, मागे बोल फिरूनी,
आम्ही कोल्हापूरचे मुशाफिर आलो ग चालूनी,
आमचे गाव कि कोल्हापूर, करवीर गं शहरं संगमावर-
पंचगंगेच्या,

जरि पटका भगवा झेंडा पहिल्या कोनाचा,
शिवछत्रपतीची शान, असा अभिमान, नौबती झडती,
किर्तीची पाखरं, दाही दिशांना उडती.
लाख मोलाची करवीर नगरी, पुण्याई पदरी.
ह्या कलापूरी मी फिरून जन्मा येते ॥

गावामागून गावं जाती गं
अभिमानानं फुलली छाती ॥
दिमाख दिसला शहर पुण्याचा
श्रोता रंगला सोलापूरचा
गावकरी भुलला बारामतीचा,
बार्शी, लातूर पंढरपूरचा,
गावामागून गावं जाती गं
अभिमानानं फुलली छाती ॥



## १६ इष्काचा खेळ (बाई मी भोळी)

मिशीवर ताव, मारतोय भाव,
कानात फाया, मस्त गुलाब,
आजकाल पाटलाचा लई रुबाब ।। धृ. ।।

उसाचा फड त्याच्या रानामंदी,
तमाशाचा फड त्याच्या गावामंदी,
रातभर जागुन, नको ते मागून,
फुकटात ऐकतोय सवाल जबाब ।। १ ।।

काळा सावळा जरी रंगानं
लांबरुंद दिसतो अंगानं
उसाचा पैसा, फुगलाय खिसा,
आल्या गेल्याचा नाही हिसाब ।। २ ।।

मला बघून येते लहर,
याला बघून घेते पदर,
करावं काय सुचत न्हाय,
इष्काचा खेळ हयो लई खराब ।। ३ ।।

## १७ बाई मी भोळी (बाई मी भोळी)

गावं पडलं हे टग्याचं,
सांगा कसं मी वागायचं,
तितं एक होती सोनेरी ठोळी,
बाई मी भोळी गं बाई मी भोळी ॥ धृ ॥

पान्याला गेले मी एकली गं,
रानात वाट माझी चुकली गं,
एकजण आला धरलं पदराला,
तोल जाऊन मी पडले खाली ॥ १ ॥

धुन्याला गेले मी दुपारला,
पान्यात कुनीतरी उतारला,
न्याहाळून पाही, काय करू बाई,
भिजलं पातळ आणि भिजली चोळी ॥ २ ॥



जतरला गेले मी नवसानं,
घातच केला त्या दिवसानं,
कुनी तरी आलं कसं तरी झालं,
नारी जात म्हंजे लई दुधखुळी ॥३॥

□ □ □


## १८ राया मला घेऊन जाणार कवा (बाई मी भोळी)

हे दिवस थंडीचे असून काहिली झाली,
ही नार नवेली उभी घामानं न्हाली,
किती उसासा टाकू आता, आनि कुनाला मागू दवा,
मला सोसना हितली हवा,
राया मला घेऊन जानार कवा ॥ धृ. ॥

लगीन झालं नि अडचन आली,
जवळ असून बी कुचंबना झाली,
दूर राहून ताटातूटी ही,
बाई चैन पडेना जिवा, ॥ १ ॥

कधी बेटलो बी न्हाई दोघं,
किती किती मी काढली सोंग,
सासू सासरा जागत बसलं,
उशाला ठेऊन दिवा, ॥ २ ॥

रजा काढून एक डाव यावं,
मला म्हमईला घेऊन जावं,
राजारानीच्या भेटीसाठी,
धनि उपाय काढा नवा, ॥ ३ ॥



## १९ सख्या साजणा (थांब लक्ष्मी कुंकू लावते)

या तंग पैठणीचा चोळीवरन राग,
माझ्या तरुणपणाची आली फुलून बाग,
मला याद आली, कुणाची कुणाची
सख्या साजणाची, सख्या साजणाची ।। धृ· ।।

कमर कचली ग कशी नाच नाचू,
पदर सावरना कशी आज लाजू,
मला दृष्ट लागेल, लाखो जणांची ।। १ ।।

उभारी वयाला कसा पोच यावा,
जपुन चालताना चुकुन तोल जावा,
अशी कोकीळा मी आंबेवनाची ।। २ ।।

नटुनी उभी मी अशा रंगराती,
खुषीनं धरावा असा हात हाती,
मिठीने फुलावी कळी यौवनाची ।। ३ ।।



## २० प्याल्यात बुडाली दुनिया (थांब लक्ष्मी कुंकू लावते)

ही सांग कशाची किमया,
प्याल्यात बुडाली दुनिया ।। धृ. ।।

नकली मदीरा, नकली प्याला,
घडी भरावी, नशा कशाला,
मी मस्तानी, मी मदीराक्षी, मी मदनाची छाया ।। १ ।।

नजर लाऊनी या नजरेला,
घे पिऊनी या मदिरेला,
गाली ओठी, लाज चोरटी, लाल गुलाबी माया ।। २ ।।

शृंगाराचा कैफ वेगळा,
दाही दिशात फेस उसळला,
आतुर नेत्री, मीलन रात्री कां अडखळसी वाया ।। ३ ।।



## २१ चंद्रावरती चला (गणानं घुंगरू हरवलं)

अपोलो सोळा रॉकेट आमचं,
नाव नोंदवा लौकर तुमचं,
नंबर लावा पळा अहोराव,
चंद्रावरती चला, चंद्रावरती चला, चंद्रावरती चला ।।धृ.।।

तुला हवा न्हाई सोसनार चंद्राची,
आदी ट्रायल बगुया उंदराची,
तिनं काय तरी होईल बला
मला धरतीचा आला कंटाळा,
घडीघडीला होतोय घोटाळा,
ज्यो त्यो उठतोय नाचायला सांगतोय, कमरला सुटल्यात कळा ।।१।।

न्हाई चंद्रावरती वस्ती ग
मग कुनासंग करशील दोस्ती ग
तुजी जाईल वाया कला
हाय का कुनितरी आर्मस्ट्राँग.
धाडस करा नी चेकींग करा, उडायचा शिगनल दिला ।।२।।

कशाला जाताय राव तिकडं
तुम्ही आम्ही जाऊ त्या चंद्राकडं
तितं ज्वानीचा पिकलाय मळा ।।३।।

## १२ झोंबतो गारवा (गणानं घुंगरू हरवलं)

चंदनाच्या पलंगी शेज मखमली लाल,
दोन उशा रेशमी, गरम लोकरी शाल,
पर झोप न्हाई आली जागरण झालं काल,
रंगमहाली उब असून कां काटा फुलतोय नवा,
ग बाई बाई झोंबतो गारवा ॥ धृ ॥

अंग नाजूक ग, मला रुतली उशी,
आली जांभई ग निजते बदलुन कुशी,
खिडकीमधूनी खुनवत होता, चवतीचा चांदवा ॥ १ ॥

रागारागानं मी गेले कोन्यात ग,
चिंब न्हाऊन मी पाहिलं ऐन्यात ग,
मनात माझ्या घुमु लागला मदनाचा पारवा ॥ २ ॥

आज आला तुम्ही माझी केली कदर,
झाली नजरानजर, घेते लाजुन पदर,
खुषाल यावं जवळी घ्यावं, धरून हात आडवा ॥ ३ ॥

□ □ □

## २३ एक पाखरू घुमतय मनामंदी (गणानं घुंगरू हरवलं)

रातभर जागते मागनं मागते,
हळूच सांगते कानामदी
एक पारवळ घुमतय मनामदी ।।धृ.।।

अंगारंगाची गट्टी जमली,
नाचनाचून घुंगरू दमली,
छबीदार छबी महालात उभी,
पालीची चुकचुक कोन्यामदी ।।१।।

मला ज्वानीचा झालाय भार
तनू सावळी नार सुकुमार,
डोळयाचं बोलणं गालात लाजणं,
इशारा वळखा गान्यामदी ।।२।।

असं रोज रोज सजणा याल कां,
दोन्ही हातानं जवळी घ्याल का,
माज्यासाठी धावत एकांत घावला
इष्काची महफिल रानामदी ।।३।।



## २४ म्हायेरी जाऊ नको म्हणतोय (गणानं घुंगरू हरवलं)

ह्या वेडयाला कुणीतरी सांगा
घडी घडी माझ्या संग भांडतोय,
मला म्हायेरी जाऊ नको म्हणतोय.... ॥ धृ ॥

झालं लगीन वरीस सरलं,
झाली जादू नी कायतरी घडलं,
जडपणानं काळीज भरलं,
गडी रागानं तिनताड उडतोय.... ॥ १ ॥

कदी पिरतीनं घेतो जवळी,
जाते लाजून काया कवळी,
घाली गळ्याची शपत आपली,
लाडी गोडीनं जाळं इनतोय.... ॥ २ ॥

हित ऱ्हाऊन मी चालणार कसं
चार चौघात होईल हसं,
त्याला माझंच लागलयं पिसं,
दिस रातीला माज्यासाठी शिनतोय.... ॥ ३ ॥

□ □ □

## २५ घ्यावा एकच घुटका (गणानं घुंगरू हरवलं)

तुम्ही माझ्यासाठी ठोकर मारूनी
आला दुनियेवरी
मी तुमच्यासाठी तुमच्या मागं
आले सावलीपरी
आता नका लावू जिवाला चटका
राया घ्यावा एकच घुटका ॥ धृ ॥

बगता कशाला वळुनी मागं,
आता कुनीबी नाही जागं,
सारं नसतं सांगण्याजोगं,
ठेव खुंटीला काढुनी पटका ॥ १ ॥

रात टिपूर चांदणं लयाली,
काया धुंदीनं बेहोश झाली,
दोघं एकांती जवळ आली,
दृष्ट लागेल अशी ही घटका ॥ २ ॥

□ □ □

## २६ रिक्षा होऊ दे सुरू (एक गाव बारा भानगडी)

हवा मारूनी चाकामंदी तेलानं टाकी भरू,
राया आता रिक्षा होऊदे सुरू ।। धृ ।।

भरवेगानं पळवा गाडी,
मागं टाकूया डोंगर झाडी,
खाचा खळग्यांची गंमत कळुदे
लाईन किल्लेर करु ।। १ ।।

वर्दळ बघुनी हॉर्न वाजवा
बाजु देऊनी रिक्षा पळवा,
पुलाखालुनी थेट जाऊदे
बिरेक नका मारू ।। २ ।।

मधल्या वाटनं जाऊ पुण्याला,
कळून देऊ नका हो कुणाला,
कँपामधनं फिरू आणि मग,
जिवाची मुंबई करू ।। ३ ।।



## २७ आता लग्नाचं वय माझं झालं (एक गाव बारा भानगडी)

मदन वाऱ्यानं कळी उमलली
फुलांचं रूप मला आलं ग,
घडा ज्वानीचा उमटला,
अन् लाजेनं अंग माझं न्हालं ग,
आता लग्नाचं वय माझं झालं गं ।। धृ ।।

माझं मला हे कोडं सुटना,
नव्या चोळीची गाठ बसंना,
खांद्यावरती पदर ठरना,
हातात चालल्यात चाळ गं ।। १ ।।

रंग डाळींबी व्हटात खुलला,
गोऱ्या गालात गुलाब फुलला,
धुंद केवडा अंगी भरला,
वासानं रान सार भरलं ग ।। २ ।।

तरुण पणानं केला इशारा,
आज वलांडला त्येनं हुंबरा,
चुकुन जाईल तोल मनाचा,
म्हणून काळीज भ्यालं गं ।। ३ ।।

□ □ □

## २८ राया आता हिरीला इंजन बसवा (पाठचा भाऊ)

तुमच्या राणीचा काढा रुसवा,
राया आता हिरीला इंजन बसवा ।। धृ. ।।

म्हेनत करून पिकवा मोती
मारा ऐदान दगडावरती,
थोडया अंतरावर सुटला झरा हो
धरतीचा बाग फुलवा ।। १ ।।

फायदा होईल हातोहात.
नका पावसाची पाहू वाट
जाग्या जाग्यानं शेतामधनं
पाटानं पाणी फिरवा ।। २ ।।

करा सुरवात आजच्या आज,
धरणी नटून करू दे साज,
असा शिडकावा करून तुमच्या,
शेतात पुरतं भिजवा ।। ३ ।।

□ □ □

## २९ गजरा मोगऱ्याचा (बारा वर्षे सहा महिने तीन दिवस)

अंगठीत बसवा माझ्या अहो,
अंगठीत बसवा माझ्या खडा, खडा जी हिऱ्याचा
मनगटात बांधीन तुमच्या
गजरा मोगऱ्याचा हो गजरा मोगऱ्याचा ।। ध्रृ ।।

मैफलीस आला रंग,
बिजलीवाणी लवते अंग,
किती सावरू ग बाई, किती सावरू ग बाई
घोळ मी निऱ्याचा ।। १ ।।

काल भेट होती घडली,
नजर काळजाला भिडली,
आज तोच दिसला फेटा, आज तोच दिसला फेटा,
रेशमी तुऱ्याचा ।। २ ।।

रात झाली हलकी फुलकी,
रंग महालाच्या तबकी,
तनु आज अवघी झाली, तनु आज अवघी झाली,
विडा केशराचा ।। ३ ।।



## ३० आले वयात (बारा वर्षे सहा महिने तीन दिवस)

ती : आले वयात, आले वयात,
आले वयात मी, काय माझा गुन्हा,
काय माझा गुन्हा ?
तो : आली वयात ही, हिचा काय गुन्हा,
ओऽ जी–जी-जी-जी व्हय रं रामा.
जी-जी-जी
ती : हात झाकू किती चांद मुखड्यावरी,
चांद मुखड्यावरी ?
सोळा वर्ष उभी अंग अंगावरी,
जड झालाय मला माझा तरुणपणा,
आले वयात मी... ... ...
तो : वय म्हणती सोळा, आनि त्यात दोन मिळवा,
अहो दिवाणजी, एवढं गणित करा,
अहो धनपालजी, एवढं गणित करा,
अहो कोतवालजी, एवढं गणित का,
ओऽ जी-जी-जी-जी व्हय रं रामा-
जी–जी–जी
ती : रोज नटुनथटुन येते तुमच्या पुढे,
येते तुमच्यापुढं,
वय घालते भिती माझं काळीज उडे.
घेतला पदर तरी कंठ पडतो उणा,
आले वयात मी..........
शालु नेसून नवा जरी झाले खुषी,
जरी झाले खुषी,
पाठमोरी उभी सांगा राहू कशी !
नका न्याहाळू अशी मला पुन्हा,
आले वयात मी.........

## २१ राया करते मी पाहुणचार (टिळा लाविते मी रक्ताचा)

अहो लई दिवसं झालं बघते तुमची वाट असं
अहो रावजी अहो भाऊजी, सरळ या कुठं...
चिरेबंदी वाड्यात बरं बरं कशाला.......
वाड्यात बसविते धरूनि मी तुमचा हात हा बरं बरं......
अहो राणीला लाजवा एक डाव गाजवा माझ्यावरी आधी
या हो राया करते मी पाहुणचार ॥ ध्रृ.॥

तुम्ही आज, बावरा जीव झाला,
सखे ग आता सुचेना हिला चाळा
शिंपीन तुम्हावर वाळा मिसळुन पाणी
तबकांत ठेवीत नक्षीची अत्तरदाणी
हो हातामध्ये गजरा, गळ्यात साजरा
मोगऱ्याचा आणते हार, ग बाई बाई
मोगऱ्याचा आणते हार.
याना करते मी पाहुणचार ॥ १ ॥

पुन्हा पुन्हा कसा ऐना,
सखे ग बाई आता रंगात आली मैना
लावुन मधाचं बोट नका हो
जाऊ पंडित उबवीत सांगा कशी
मी राहू हां हां. . . . .
रातभर जागला अन इचारानं वागला
आता जरा करा अविचार
या ना हो राया करते मी पाहुणचार ॥ २ ॥

□ □ □

## ३२ जरा जपून शिपण खेळा (टिळा लाविते मी रक्ताचा)

पंचमी अजुनि दूर राहिली, जमला कसा मेळा
अहो कशाचा मेळा, जरा जपून शिपण खेळा ।।

भले भले...भले भले
किती आले किती गेले
झाले भवतीनं गोळा, गोळा ।।

अहो सजणा...मन रमणा
मी ही आले नटून, कशी दिसने उठून,
कवळी काकडी बघून कोल्हा पडतो तुटून
काहो बघताय रोखून डोळा...
जरा जपून शिपण खेळा,
रावजी जरा जपून शिपण खेळा ।।

वाह्वा...वाह्वाऽ पिचकारी उडवा
खुदूऽ हसुनी बोला बोला ।।
अहो रावजी, अहो भाऊजी
रात कुणीतली झाले गौळण मी,
नवरंगामधी केलं शिपण तुम्ही,
केले हो मी शिनगार सोळा
जरा जपुन शिपण खेळा ।।

भले भले
वाट काढू कशी गर्दीतूनी,
चुरगळला पदर, इसकटली चुनी
झाला शालूचा चोळा मोळा,
जरा झपून शिपण खेळा ।।

## ३३ मनरमणा ( वारणेचा वाघ )

ती : वर्साच्या जत्रंला यवढ्या लांबून आला
तो : तर हो
ती : तुम्हासाठी लावला कौल खंडेरायाला
तो : अस्सं
ती : आता कसं होईल काय होईल
तो : काय झालं ?
ती : जीव थोडा थोडा झाला
तो : आरे आरे आरे
ती : घडलं मनासारखं आता वचन दिल्यालं पाळा
तो : दिलं, हां, हां, हां,
कोरस : घडलं मनासारखं आता वचन दिल्यालं पाळा,
तुम्हासाठी लावला कौल खंडेरायाला
थोडा थोडा जीव झाला
मनरमणा जी, जी, जी, ।। धृ. ।।
ती : अहो अदबीनं सांगते, जवळ जरा या ना,
जवळ जरा या ना हात हाती घ्या ना
सख्या साजणा हो तुम्ही मनरमणा ।। १ ।।
कोरस : आम्ही गातोय सुरात पहिल्या भरात
आली रंगात रानी कशी नाचतीया मोरावानी
थुई थुई थुई
तो : फिरत्या पाळण्यात मजला फिरवा
झुलत्या घोड्यावरती मला बसवा
जरा हसून नजरच्या करू या खुणा ।। २ ।।
ती : चला जाऊ संग संग,
आता जत्रंचा लुटुया रंग,
म्होरल्या वर्साला येऊ पुन्हा
अहो अदबीनं सांगते मी जवळ जरा या ना
जवळ जरा या ना हात हाती घ्या ना
सख्या साजणा हो
तुम्ही मन रमणा ।। ३ ।।

## २४ तिळगुळ घ्या ( सुगंधी कट्टा)

आली संक्रांत इष्काच्या घोड्यावरनं,
जाई मिरवत, सूर्याच्या वाड्यावरनं,
लाडीनं सागते गोडीनं सागते,
मनात भाव ह्याय भोळा,
अवो, तिळगुळ घ्याहो, गोड गोड बोला,
हो तिळगुळ घ्या गोड बोला ।। धृ. ।।

ह्यो घारवाडी, जरीचा शालू की पिवळा,
आत लपलाया, रूपाचा खजिना कवळा,
सातारी पेढा, अबलख घोडा
अस्सल मराठ मोळा ।। १ ।।

भर थंडीत, वाऱ्याच्या येत्यात लाटा,
वर मदनाचा फुलतोय गुलाब काटा,
लाजचं लेनं, पिरतीचं गानं,
डोळ्यांत झालंय गोळा ।। २ ।।

तीळ गालाचा व्हटाच्या मदात बुडवा,
सण वर्साचा रंगाची बहार उडवा,
तुमच्या साठी, जागिन राती,
करून शिणगार सोळा ।। ३ ।।

□ □ □

# ३५ रात ही धुंदीत जागवा ( सुगंधी कट्टा)

प्रोज : मी आनि तूऽऽऽ, तू आनि मी (व्हिस्पर)
दोन जिवांचा संगम जुळला इरादा कळला,
खाजगी बैठकी मधी, सुगंध दरवळला,
आता सारं निवांत...शांत...शांत... (उसासा)
एकांत मिळाला दोन पाखरं बसली,
नागिन होऊनी, झोप दुनियेला डसली,
नको परकेपनां, मला तुमची म्हना,
घरच्यावानी मला वागवा, वागवा, वागवा,
रात धुंदीत ही जागवा ।। धृ ।।

जशी तबकात मेनकेवाणी,
उभी नक्षीची, अत्तरदाणी,
पेला देतें भरून, अशी सुरई धरून,
डोळं मस्तीमधी रंगवा ।। १ ।।

मी घडीभरची अस्तुरी,
दरवळती मदन कस्तुरी,
तुमच्या सपनामधी रानी होईन कधी–
मला गरतीवानी नांदवा ।। २ ।।

धूर पैशाचा निघतोय जनू,
अशा धुक्यात भिजली तनू,
दिस गेला ढळून, रात आली फुलून-
डाव अर्ध्यावरी भागवा ।। ३ ।।

□ □ □

## २६ काय म्हनू मी हिला ( सुगंधी कट्टा)

कोरस : लगबग, लगबग, बिगी, बिगी, बिगी,
थुई थुई नाचत आली !

ती : नाचू किती, लाजू किती, कंबार लचाकली,
ठेच लागली जाता जाता जोडवी टचाकली !
कोरस : बाजारपेठ ही कोल्हापूरची, काय मी म्हनू हिला.
नखरेल नार हो सोळा जातीची दिसली खरी कला !
ती : नाचू किती, लाजू किती, कंबार लचाकली ॥ ध्रृ ॥

हे ज्वानिचं चाललं गुराळ,
बारा गावंच, जमलं दलाल,
काहील भरली, उकळी फुटली, पावनी हराकली ॥ १ ॥

ह्या मदनाच्या ढेपा भरा
भाव सोन्याचा सौदा करा
मारित मिटक्या वाजवित चुटक्या, सारिच तराकली ॥ २ ॥

ह्या पावण्यांचा भरलाय खिसा
तीर डोळ्याचा रोकलाय कसा
बळजोरी ह्यांची, बघून माजी कवटी सराकली ॥ ३ ॥

□ □ □

## ३७ हुरहुर ( सुगंधी कट्टा)

घुंगरं, आज कशी रुसली,
साजणा, हुरहुर ही कसली ॥ ध्रु ॥

झील : आता कुटं कुटं शोधु तुला राया,
कशी येईना तुला रे हिची माया ! साजणा !

गळ्यामधी एका एकी सूर कसा सुकला,
सूर कसा सुकला ग, ताल कसा चुकला,
नार नवेली, साधी नि भोळी, नाही कुणा दिसली ॥ १ ॥

आठवन आली तशी, दोनी डोळं भिजलं,
दोनी डोळं भिजलं ग, दिवं कसं इजलं,
अंधाऱ्या राती,भिनभिन ज्योति,एकली जळत बसली ॥२॥

ताटा तुटी सोसंना ही जीव माझा तुटतो,
जीव माझा तुटतो रं, गहीवर फुटतो,
येईल माजा, पिरतीचा राजा, आशा मनी हसली ॥ ३ ॥



## ३८ राजा झाला गुलाम ( मला तुमची म्हणा )


मैफिले भरली आज उघडला इष्काचा पिंजरा,
लाज सुरांच्या झोपाळ्याबर बैस नीट पाखरा,
राजा झाला गुलाम, राणी करते सलाम ॥ ध्रृ ॥

कोरस : जिवलगा नका देऊ दगा–

घेते न्यहाळून डोळ्यांत मुडा,
टाकते काळजाचा उतरून तुकडा,
नको करू दौलत जादा,
तुझ्या लागते मी नादा,
नका देऊ पाखरानो पैसा छदाम ॥ १ ॥

नाच नाचुनी किती घेऊ गिरकी,
डावा डोळा नजर एक तिरकी,
किती बाई बावरू मी,
पदराला सावरू मी,
लोक लाज सोडले मी झाले वदनाम ॥ २ ॥

तोल सुटलाय माझ्या मनाचा,
घोडा चौखूर तरुन पनाचा,
भवळ मला आली बाई,
दिसनागं पुढचं काही,
आडवून त्याला राया खेचा लगाम ।३।



## ३९ लॉटरीचं तिकीट काढा ( मला तुमची म्हणा )

कोरस : लागलं तर लागलं, नशिबानं लागलं,
नाहीतर समजा रुपयांत भागलं,

शेवंता : अडीच लाखाचं काळीज तुमचं,
चेक पिरतीचा काढा,
लॉटरीचं तिकीट काढा,

स्त्री कोरस : सख्या साजना तुमी,
सख्या साजना बोला,
पाकीट खोला राया पाकीट खोला

शेवंता : ममईस बांधू बंगला माडी
पेशल घेऊ मोटार गाडी,
इकून टाकू...शेतीवाडी...

सर्वजण : तिकीट एक काढा, आता तिकीट एक काढा,

शेवंता : इचार आता कसाला करता,
ताकद लावुन म्होर ढकलू,
संसाराचा गाडा.


□ □ □

## ४० कंचुकी ( मला तुमची म्हणा )

हो गौर अंगकांती भरला उभार बांधा,
वाकून नाचता मी, झुकतो हळूच खांदा,
या रूप यौवनाला तुमचीच मालकी,
रूतली उरात बाई जरतारी कुंचुकी, ।। धृ ।।

तिरकी नजर निशानी,
धुंदी कशी शराबी,
मुजरा करून हाती,
घेते अशी बिदागी,
ही पायधूळ राया लावीन मस्तकी ।। १ ।।

द्या वायदा उद्याचा,
वचनास हात घ्यावा,
देते विडा खुणेचा,
डोळे मिटून घ्यावा,
तुमची बघीन वाट बैसून मंचकी ।। २ ।।



## ४१ मागणी ( डोंगरची मैना )

आता काय करू याच्या जुलमाला,
मला मागणीच घालतोय लग्नाला ।। धृ. ।।

आता बाई कशी ही बला मागं लागली,
तिन्ही सांजला, तिन्ही सांजला,
शेजारी न्हाऊन ओळख झाली,
कारण नसताना हसला गाली,
उगाच थोडीशी बोलाचाली,
चल म्हणाला जाउ गं सिनेमाला ।। १ ।।

भिड मोडून मी गेले संग,
त्याचा न्याराच दिसला रंग,
चुकुन अंगाला लागलं अंग,
काटा सरकून आला अंगाला ।। २ ।।

तिन्ही सांजचा अंधार पडला,
एकटी बघुन मी घरात शिरला,
केली धिटाई दांडगावा केला,
त्यानं गपकन माझा हात धरला ।। ३ ।।

□ □ □

## ४२ जोडीदार ( डोंगरची मैना )

गडी अंगानं उंचा पुरा,
ग बाई मला जोडीदार दिसतोय बरा ।
खरच हिला जोडीदार दिसतोय बरा ।। धृ ।।

मला बघून करतोय खुणा,
होता पानाला लावत चुना,
बरा न्हवं ह्यो चावटपना,
ह्याच्या वागण्याची न्यारीच तरा ।। धृ ।।

मला बघून करतोय खोडी,
धूर काढून वढतोय विडी,
नेम धरून फेकतोय काडी,
इकरा बाजीत मुरलाय पुरा ।। २ ।।

मला बघून होतोय फिदा,
करील खुशाल दौलत जादा,
कशी लागू मी त्याच्या नादा,
ह्याचा कुणीतरी जामिन भरा ।। ३ ।।

☐ ☐ ☐

## ४३ म्हमई बघायची ( डोंगरची मैना )

ठेवा बाजुला अडी अडचणी करा तयारी निघायची
औंदा म्हमई बघायची हो औंदा म्हमई बघायची
काय तरी करून कसतरी करून करा तयारी निघायची
औंदा म्हमई बघायची, दाजीबा म्हमई बघायची
औंदा म्हमई बघायची, भाऊजी म्हमई बघायची ।। धृ ।।

भल्या पाहटचं उठुन दोघं,
सामान बांधुया घेण्याजोगे,
अहो घाईघाईनं तिकीट काढा, न्हाइतर गाडी चुकायची ।। १ ।।

घाटाघाटात येऊन
वळत गाडी जाऊ बोगद्यामधुन,
अहो खिडकीमधुन खाली वाकून, दरीतली शोभा लुटायची ।।२।।

दिवसा राणीच्या बागत जाऊ,
बघू चौपाटी भेळपुरी खाऊ,
अहो अंधार पडता दोघं जोडीनं, मलबार टेकडी चढायची ।।३।।

अशी म्हमई म्हनत्यात लोकं,
तवापासून फिरलय डोस्कं,
अहो बघायची न इसरून आता, इष्काची मजा लुटायची ।। ३ ।।

□ □ □

## ४४ नाव मी घेऊ कशी ( डोंगरची मैना )

माझं लगीन ठरलं आनि झाली खुशी
अहो झाली खुशी !
आता नवऱ्याचं नाव मी घेऊ कशी ॥ धृ ॥

तंग पैरण, लांबरुंद पाठी,
दंड पिळदार, पल्लेदार छाती,
त्या छातीवर मान मी ठेवू कशी
अहो ठेवू कशी ॥ १ ॥

राव पैलवान चालीनं चालतो,
गोड पोपटाच्या बोलीनं बोलतो.
त्याच्या संग मी हितगूज बोलू कशी.
अहो बोलू कशी ॥ २ ॥

मला जवळ जावसं वाटतं,
पर पाऊल कुठतरी तटतं,
आता रातभर एकली ऱ्हाऊ कशी
अहो ऱ्हाऊ कशी ॥ ३ ।



## ४५ नखरा ( धन्य ते संताजी धनाजी )

गुलजार गुलछडी, नटुनी मी खडी खडी
नाचते मी घडी घडी, करते नखरा नखरा
बाई माझ्या पायाला बांधलाय भंवरा ।। धृ ।।

खडखडीत बांधा, उभा सुरत गोरटी,
भिरीभिरी शोधते, कुणा चोरटी,
चोळी माझी चंदनी तंग तंग पैठणी,
चुणीवर चुणी चुणी उडवी पदरा पदरा ।।१।।

डाळींब फुटे ओठांत, गालामध्ये लाज,
मी तरुणपणाचा जपून घेते अंदाज,
छुम छुम बोले चाळ, नागमोडी माझी चाल
भवतीचा सुरताल, मारती चकरा चकरा ।।२।।

बेभान नाचते, रुप गुणाची राणी,
उर होतो खालीवर बाई पारव्यावाणी
अडवून जागोजाग, बळजोरी नगं नगं
जाते बाई, लगबग, सख्याच्या नगरा नगरा ।।३।।



## ४६ थंडीचा पडलाय कडका (कसं काय पाटील बरं हाय का)

धुंद रूपेरी रात्र लाजरी, मध्यानीची ही घटका,
माघाचा महिना हुडहुडी जाईना,
कशी ग होईल सुटका,
आता उबेला शेकोटी हुडका, करा सुटका
अहो लई थंडीचा पडलाय कडका ।। धृ. ।।

सुरत सावळी मोलाची अहा ऽऽ
मदन राजाच्या तोलाची,
व्हटात हासू हा ऽऽ नकट्या नाकावर
राग प्रीतीचा लटका–करा सुटका ।।१।।

चालताना पाय माझा अडतोय ग,
हा हा डावा डोळा का उडतोय ग,
केला इशारा हा ऽऽ अचूक हेरलं,
शालूला भुललाय पटका–करा सुटका ।।२।।


आता मला न्हाई न्हावत गं
हा हा हा, पायजे असंल ते न्हाई गावत गं
चैन पडेना हा ऽऽ भेटीसाठी,
जीवाला लावलाय चटका,–करा सुटका ।।३।।

□ □ □

## ४७ तोल ( कसं काय पाटील बरं हाय का ? )

घेऊन डोईवर तरुणपणाचा घडा,
शिणगार वाडीचा चढते डोंगर कडा,
मदनाच्या वाऱ्यात पदर उडे फडफडा ऽऽ
जाता जाता ग, पाहता पाहता ग ऽऽ
तोल माझा कसा बाई सुटला,
इष्काचा घडा आज फुटला ।। धृ ।।

गेला बावरून जीव हचो भोळा,
चोर भवतीनं झाले गोळा,
आळी पाळीनं रोखून डोळा,
लाज सोडून नवा रंग लुटला ।।१।।



मला गावना कुठं
अंगाअंगात शिरशिरी उठं
खुणं खुणेला अवचित पटं,
त्याला बघून, पतंग माझा कटला ।।२।।

आज कलगीला भेटला तुरा,
ताल सुरांचा सुटला झरा,
अशा रातीची न्यारीच तऱ्हा,
माझ्या पिरतीचा पांग आज फिटला।।३।।

## ४८ पावनं जरा थांबा ( पिंजरा )

डेरेदार बहरलं झाड, लागला पाड पानाच्या आड
खुणवतो आंबा, खुणवतो आंबा,
नका तोडू, पावनं जरा थांबा ॥ धृ ॥

कोरस : अहो टोपीवालं, अहो फेटेवालं,
टकमक टकमक बघू नका, हा माग मागं लावू नका,

ती : भलत्याच गोष्टी करू नका
नका तोडू, पावनं जरा थाबा ॥ १ ॥

ती : दानं अस्सल तांबूस पिवळा,
टचटचून रसानं भरला
हिरवट गोडी आंबट थोडा सालीत मऊमऊ गाभा
नका तोडू पावनं जरा थांबा ॥ २ ॥

ती : भार देहाला सोसत नाही,
आली झुळूक हेलखावा खाई,
नजरा सावरा थोडक्यात आवरा,
कैकानी धरला दबा,
नका तोडू पावनं जरा थांबा ॥ ३ ॥

आदि वाजवताय हातानं चुटक्या
'आता कशाला मारता मिटक्या
उधळपणाला लगाम घाला,
गावाला होइल सोबा,
नका तोडू पावनं जरा थांबा ॥ ४ ॥

□ □ □

## ४९ उचकी ( पिंजरा )

आली आली सुगी, म्हणून चालते बीगी बीगी
गोष्ट न्हाई सांगण्या जोगी
कुनी गालावर मारली टिचकी
मला लागली कुणाची उचकी

कोरस : कुणाची ग कुणाची हृयाची ? का त्याची
लाजू नको, लाजू नको, लाजू नको
मला लागली कुणाची उचकी ।। धृ ।।

तरणी ताठी नार शेलाटी, चढले मी बांद्यावर
अटकर बांधा गोरा गोरा खांदा पदर वाऱ्यावर
कानामध्ये चाहूल वाजलं त्याच पावूल
माझ्या उरात भरली धडकी,
मला लागली कुणाची उचकी ।। १ ।।
[illegible]
वाऱ्याच्या लाटा थंडीचा काटा मनात न्यारी खुषी
सपनात आला त्यान छेडलं बाई मला
त्याच्या डोळ्याची नजर तिरकी
मला लागली कुणाची उचकी ।। २ ।।

उठून सकाळी, लई येरवाळी गेले पाणवठ्यावरी
उन्हात बसले न्हात अंगाला पानी गुदगुल्या करी
पाण्यामध्ये दिसत्याच लागलं मला पिसं
त्यानं माझीच घेतली फिरकी,
मला लागली कुणाची उचकी ।। ३ ।।

रात दीस जागते, वाट त्याची बगते,
किती मी घालू साद,
झोप माझी उडाली, जादू कशी घडली,
जाइना त्याची याद
भेटीसाठी आले, मनी कासावीस झाले
मी मलाच झाले परकी
मला लागली कुणाची उचकी ।। ४ ।।

## ५० हे वागणं बरं नव्हं ( पिंजरा )

ती : छबीदार छबी मी तोऱ्यात उभी
जशी चांदणी चमचम नभी
अहो दाजीबा गावात होईल शोभा,
हे वागणं बरं नव्हं ॥ धृ ॥

नवतीच रान हे भवतीनं,
फिरत आले मी गमतीनं,
बांधावरनं चालू कशी,
पाठलाग हयो टाळू कशी,
अरं लाजमोड्या ? भलत्या करतोस खोड्या,
हे वागणं बरं नव्हं ॥ १ ॥

डौल दावते मोराचा,
तिरपा डोळा चोराचा,
वड्याच्या काठाला अडवितो,
अंगावर पाणी उडवितो,
अरं बजरंगा ? नकोस घालू पिंगा,
हे वागणं बरं नव्हं ॥ २ ॥

मिरचीचा तोडा मी करते रं
वट्यांत ऐवज भरते रं
पदर माझा धरतीस कसा
भवतीनं माझ्या फिरतोस कसा
अरं बत्ताशा, कशाला पिळतोस मिशा,
हे वागणं बरं नव्हं ॥ ३ ॥

हिरवी शेतं दरवळली
टपोरं कणसं मोहरली
शिळ घालूनी करतोस खुणा, घडीघडीत चावटपणा
अरं मर्दा ? अब्रूचा होईल खुर्दा
हे वागणं बरं नव्हं ॥ ४ ॥

## ५१ दिसला ग बाई दिसला ( पिंजरा )

आले मी मी अवसेच्या भयाण राती
काजवा उडं, किरकिर किडं
रानात सुरात गाती
दिलाचा दिलवर, जिवाचा जिवलग कुठं दिसेना मला
इथं दिसना, तिथं दिसना, शोधू कुठं, शोधू कुठं
दिसला ग बाई दिसला, मला बघून गालात हसला
ग बाई हसला ।। धृ ।।

गडी अंगानं उभा नी आडवा
त्याच्या रूपात गावरान गोडवा
तेजाळ मुखडा, सोन्याचा तुकडा
काळजामंदी घुसला ग बाई बाई काळजामंदी घुसला
काळजामंदी, काळजामंदी, काळजामंदी
दिसला ग...।।१।।

माझ्या राज्याचा न्यारा डौल,
डाव्या डोळ्याचा देती कौल
लहरी पटका, मानेला झटका भाला उरी घुसला
भाला उरी, भाला उरी, भाला उरी
दिसला ग... ।। २ ।।

अंगा अंगाची करने आग
आग आगीवर झाली फिदा उडाला भडका,
चढलं धुंदी, जीव जीवाला फसला
दिसला ग बाई... ।।३।।

□ □ □

## ५२ इष्काची इंगळी ( पिंजरा )

मी एकलीच निजले, रातीच्या अंधारात,
नको तिथंच पडला, अवचित माझा हात,
हाताखालती नांगा काढुन वैरिण ती बसली
ग बाई मला इष्काची इंगळी डसली
वाई ग, बाई ग, ॥ धृ ॥

मारली किंकाळी कळ लई आली,
उरी घामानं भिजली चोळी,
अंगा अंगाची काहिली झाली,
सांगा ही कळ कसली, बाई
मला इष्काची इंगळी डसली
बाई ग, बाई ग. ॥ १ ॥

साऱ्या घरात फिरलें बाई ग
मला औशिद गावलं न्हाईग
तवर कुणाची चाहुल आली
खुण खुणेला पटली, बाई
मला इष्काची इंगळी डसली
बाई ग, बाई ग, ॥ २ ॥

ह्या इंगळीचा कळला इंगा,
खुळ्यावानि मी घातला पिंगा,
मंतर घाला हलका हलका
नार चुकुन फसली, बाई
मला इष्काची इंगळी डसली
बाई ग, वाई ग, ॥ ३ ॥

□ □ □

## ५३ रंगमहाल ( पिंजरा )

तुम्हावर केली मर्जी बहाल,
नका सोडून जाऊ, रंग महाल ॥ धृ ॥

पापण्यांची तोरण बांधुन डोळ्यावरती,
ही नजर उधळिते काळजातली पिरती,
जवळी यावं, मला पुसावं, गुपित माझं खुशाल,
तुम्हावर केली मी मर्जी बहाल ॥ १ ॥

हुरहुर म्हणुकी ओढ म्हणू ही गोड,
या बसा मंचकी सुटंल गुलाबी कोडं,
विरह जाळिता मला रात ही पसरी मायाजाल
तुम्हावर केली मी मर्जी बहाल ॥ २ ॥

लाडे लाडे अदबिनं तुम्हा विनविते बाई
पिरतीचा उघडला पिंजरा तुमच्या पायी,
अशीच व्हावी रात साजणा कधी न व्हावी सकाळ
तुम्हावर केली मी मर्जी बहाल ॥ ३ ॥



## ५४ सोबत ( जोतिबाचा नवस )

माझा वाडा नवा, गार सुटली हवा,
त्यात एकली मी, त्यात धाकली मी,
दारं खिडक्या तरी लावा,
कुनी सोबतिला माझ्या ऱ्हावा ।। धृ.।।

बाबा गेल्यात हो काल बाजाराला,
आई गेली निघुनी आज म्हायारला,
द्वाड मवाली ह्यो, संधी साधू असा,
ऱ्हायला शेजारला,
माझा मैतर जुना, करतो खानाखुना
आज रातीत करील कावा ।। १ ।।

आता वाकून या, डोळं झाकून या,
गोल खांबावरी हात टेकून या,
लाज सोडुन अशी, लाथ मारून अशी
दूर फेकून द्या–
रात आली भरून, हात हाती धरून,
डोळा डोळ्यावर लावा ।। २ ।।

आता अनुमान का, शेजवरती बसा,
खुळ्या एकांतानं जीव झाला पिसा,
गोरा मुखडा धरून, गालावरचं हसू जरा,
हळू पुसा–
एवढं ऐका धनी, रात सरते सुनी
जावा खुशाल उद्या गावा ।। ३ ।।

□ □ □

# ५५ पावन्याला लाजच नाही (जोतिबाचा नवस)

लई उतावळ सभाव ह्याचा,
जितं तितं ही घाई ।
बाई ह्या पावन्याला लाजच न्हाई ।। धृ ।।

खिसा रिकामा घेऊन येतो,
खेळ फुकट बघून जातो,
भाड्याला पैसं उसनं मागुन
परत घराला जाई ।। १ ।।

चिकू मारवाडी म्हनती त्याला,
वायदा देतोय,
शेजाऱ्याशी भांडन करतो–
शिव्या फुकटच्या खाई ।। २ ।।

ह्याच्या अंगात छप्पन खोड्या,
कुनि पकडुन ठोका बेड्या
सारी सोंगं करून वरती
नामानिराळा न्हाई ।। ३ ।।



## ५६ लगाम ( जोतिबाचा नवस. )

लई चौखुर सुटलाय बघा,
दरी डोंगरात देईल दगा,
मिटी कमरची सोडू नका,
मुक्काम–ऱ्हायल दूर साजना, हितच फुटला घाम
राया जरा घोड्याला घाला लगाम ।। धृ ।।

घोडा उमदा लई देखना,
त्याचं आयाळ हातात माइना,
दोगं बसलो तरी वाकेना,
त्याला सोडून नजर जाईना,
तगडा दिसतो,डोळ्यात ठसतो, अंगानं भरला जाम ।।१।।

लई मस्तीनं फुरफुर करतो,
माती उकरून रिंगान धरतो.
अदनं मदनं लाडीत शिरतो,
अवती भवतिनं धुंदित फिरतो,
नखरा ह्याचा लई धोक्याचा, न्यारंच याच काम ।। २ ।।

भ्या वाटतया उतरा खाली,
नवेपनाची भवळ आली,
ह्या द्वाडानं किमया केली,
नाक घोसतोय गुलाबी गाली,
रागारागानं इकून टाका, परत मागा दाम ।। ३ ।।

□ □ □

## ५७ चावी ( पांडू हावलदार. )

अहो हवालदार ! माझ्या कुलपाची चावी हरवली,
कोतवाल तुम्ही डायरित ही केस न्हाई लिवली,
माझ्या ट्रंकेची चावी हरवली.
कोतवाल तुम्हो डायरित ही केस न्हाई लिवली ।। धृ ।

पंढरपूरचं कुलुप लावलय माझ्या पेटीला,
तोडू नका तुम्ही हवालदार पहिल्याच भेटीला,
अवती भवती मिरवू नका हो,
भलती चावी फिरवू नका,
निसती शंका मनात का भरली,
माझ्या कुलपाची चावी हरवली……………।। १ ।।

बहुमोलाचा ऐवज माझा पडलाय अडकून,
समोर तुम्हाला पाहिलं न् बाई मी गेले हरकून,
कुणितरी तुम्ही असून धाडा,
माझी चावी शोधून काढा,
टंगळ मंगळ का चालविली,
माझ्या कुलपाची चावी हरवली…… ।। २ ।।

नव्या भरतीचं दिसताय तुम्ही,
कवाच मी हेरलं,
असं का हो बघता खुळ्यासारखं,
टकुर का फिरलं,
पेटी माझी घेऊन जाते,
दुसरी चावी लावून पाहाते,
मेहनत का हो फुकट घालवली,
माझ्या कुलपाची चावी हरवली…… ।। ३ ।।

□ □ □

## ५८ हवालदारीन (पांडू हवालदार)

ती : अंगात डगला कमरेला पट्टा,
डुईवर निळी टोपी घातली,
हवालदारीन तुम्हा कशी वाटली,

तो : मुखडा शराबी, डोळ्यात धुंदी,
अंगात नशा लई दाटली,
जशी इंग्लीस हिस्कीची बाटली ॥ ध्रृ ॥

ती : भल्या घरची बाई मी, काढु नका खोडी,
नका बोलू पांचाट, लाज धरा थोडी,
अवतार कसला उघड्यानं बसला,
अकलेची गंगा कुठं आटली ॥ १ ॥

तो : पारु तुझ्या केळ्यांमागं मन माझं धावलं
एक आलो हुडकाय दुसरंच गावलं,
नजरेचा घुटका, इष्काचा झटका,
मस्तीनं काया माझी पेटली ॥ २ ॥

ती : असं मला वाटतंय नाचावं नी गावं,
तो : खडकामागं नेऊन जवळ तुला घ्यावं,
चोरीचा मामला, हळू हळू.........
ती : पांडुरंगाला रखुमाई भेटली ॥ ३ ॥

□ □ □

## ५९ डोळा ( अत्तराचा फाया )

शुगर फॅक्टरी ज्वानिची,
तितं भरत्यात पोती सोळा,
ह्या ह्या पावन्यानं, डोळा की रोकलाय डोळा ।। धृ ।।

हातापायाची यंत्र फिरती
घडीघडीला थैल्या भरती
शुभ्र पांढरा मोती दाणा
पाटील करतोय गोळा ।। १ ।।

आता भांडवल वाढवा जरा,
आनि शेअरची किंमत करा,
सावध गिरनी भाव ठरू दे,
दलाल मारल गाळा ।। २ ।।

तुमची रोखीन पावती घेते,
तिरक्या नजरचा बोनस देते,
रोज नको पर कधी तरी या,
घराला लागल टाळा ।। ३ ।।



## ६० शिकारी ( पारध )

शेर : कैक मैफली झाल्या गेल्या,
अशी न आली संधी,
हरणीकडुनी आज शिकारी होईल ग जायबंदी !
नेम धरून डावा डोळा मिटला ग,
बाण सुटला, नजरबाण सुटला ।। ध्रृ ।।

(चारचौघात) (यवढ्या गर्दीत) येकली उभी,
घडीघडीला करते खुबी,
त्याची उतरून घेतली छबी,
खूण करता इशारा पटला ग ।। १ ।।

ज्वानी सुसाट पिसाट झाली,
नाच नाचुन दंगा घाली
ठिनग्या उधळीत मी वर–खाली
वगता बगता झेंडू फुटला ।। २ ।।

ह्यो इष्काचा जालीम फटका,
हित चांदण्याचा बसतोय चटका
जरा बेतानं घ्यावा घुटका
ज्यो गुतला त्यो जलमातन उटला ।। ३ ।।

□ □ □

## ६१ चाल (काय हो चमत्कार)


हातात काठी, डोईवर पाटी,
नवी नार मी नखऱ्याची,
रूप जवानी, मी मस्तानी,
चाल अशी ही तोऱ्याची ॥ धृ ॥

टंच पोटरी अटकर बांधा,
खाली वरती झुकतो खांदा,
वहर ज्वानीचा कहर करी,
मी लहर गुलाबी वाऱ्याची ॥ १ ॥

भुरभुरते बट कुरळी भाळी,
हिरवी मखमल पायाखाली,
लचकत मुरडत ठुमकत जाई,
जशी चांदणी शुक्राची ॥ २ ॥

उरात लपली लाजपाखरं,
टकमक बघती डोळं टपोरं,
तरुणपणाच्या वनातली मी,
मस्त छबी शिणगाराची, ॥ ३ ॥

घाट वाकडा हा वळणाचा,
तोल सावरू कसा मनाचा,
वेडी होऊन खूण शोधते,
आज सख्याच्या नगराची ॥ ४ ॥



## ६२ पत्र (काय हो चमत्कार)

सांगू कुणाला, नको कुणाला,
भुलल्या वाणी झालं मला
आज गुलाबी पत्र आलंय मला ॥ धृ ॥

गावशिवंच्या वळणावरती
भेटीमधुनी जडली पिरती
कुणीतरी काळीज दिलंय मला ॥ १ ॥

फुले केवडा पिवळट फिक्का
वर नागाचा बसला विळखा
त्या विळख्याच्या आठवणीनं
कुणीतरी वेडं केलंय मला ॥ २ ॥

मी मुलखाची नार अडाणी
वाचुन दावा मजकुर कोणी
वरचं वरचं समजून सांगा
गुपित आंतलं कळतंय मला ॥ ३ ॥

□ □ □

## ६३ मुरका (वाघ्या मुरळी)

नाही केवड्याला नागाचा विळखा ग,
कसा मारू मी लाजून मुरका ॥ धृ ॥

आला होता कुणी एक चोर,
वर चंद्राची हासली ग कोर,
काळ्या ढगाचा घालून बुरखा ॥ १ ॥

टक लावून बाई तो बसला,
माझ्या मनात इशारा ठसला,
तीर नजरेचा त्याच्या तिरका ॥ २ ॥

तालावाचून कसला सूर,
सखा राहिला माझा दूर,
येड्या काळजाला बसतोय चरका ॥ ३ ॥



## ६४ चंदेरी शालू (वाघ्या मुरळी)

मला चंदेरी शालू आणाल का ?
राया लाजाळूचं झाड मला म्हणाल का ? ॥ धृ ॥

ऐन भरातली नार सोळातली,
सोळा साजामधी, काया शृंगारली,
पायामधे पैंजण, डोळ्यामधें अंजन,
नजरेचा गोफ तुम्ही विणाल का ? ॥ १ ॥

का हो जाता उठून राव आला कोठून,
रंगमहाली या राणी उभी नटून,
छुम छुम नाचून, छम छम वाजवून,
हौसेनं माझ्यासाठी शिनाल का ? ॥ २ ॥

आज भोवऱ्यापरी जीव माझा फिरे,
राया तुझ्यासाठी जीव माझा झुरे,
चोळी शालू हिरवा, लागे मज गारवा,
हिरवा चुडा मला भराल का ? ॥ ३ ॥



## ६५ विंचू चावला (वाघ्या मुरळी)

कालरातीला या कोन्याला अवचित धोका आला
वाई वाई, मला विंचू चावला ।। धृ ।।

रात अवसंची, अंधार काळा
दचकून बघता, आजूबाजूला,
पाऊल पडता नांग्यावरी,माझ्या उरात भरला धडका।।१।।

कळ उठली ग लाही फुटली,
घामाघूम मी पापणी मिटली,
हाक मारिता,धावून माझ्या जिवाचा जिवलग आला ।।२।।

काय सख्यानं केली किमया
फुलापरी ही फुलली काया,
खूण राहिली पायावरी, पर कळ माझ्या हृदयाला ।। ३ ।।



## ६६ हनीमून ( सून माझी सावित्री )

काल लगीन झालं, हळद निघाली आज
ज्वानीनं हसवली अंग अंगिची लाज,
हौस हौसनं ल्याले गळा कोल्हापुरी साज,
डोसकं चालवून बोचकं बांधलं झाले मी बावरी
हनीमूनला कुटं जायाचं सांगा मला लौकरी
हो सजना, सांग मला लौकरी ।। धृ ।।

तुमचं काश्मीर चांगलं हाय कां,
तित न्हात्यात गुलाबी बायका,
नको ग बाई !
हनीमूनला कुटं जायचं, सांगा मला लौकरी ।। १ ।।

चला गोव्याला जाऊया धनी
ओल्या वाळूत खारं पानी
नको ग बाई, कोळनी येऊन घेऊन जातिल घरी !
हनीमूनला कुटं जायचं, सांगा मला लौकरी ।। २ ।।

न्हाई भाइर जाऊन फायदा
रोज कितीदा करता वायदा
नको ग बाई, संसार आपला, होवू दे घरच्या घरी !
हनीमून ह्यो सोडून द्यावा, खावा मीठ–भाकरी ।। ३ ।।

□ □ □


## ६७ लगीन ( सून माझी सावित्री )

मोठ्या मानसानी सांगितलं ते सारंच वाया गेलं,
लांबवा न् थांबवा कळंत न्हाईतर, लगीन कशाला केलं
राया तुमी लगीन कशाला केलं ? ।। ध्रृ ।।

हौसं हौसनं मांडला संसारऽऽ
तुमच्या करनीनं झाले बेजारऽऽ
मागला न म्होरला इच्चार न्हाई, डोसकंच बिगडून गेलं ।। १ ।।

वर्सा न् वर्साला पाळणा हालला हो,.
माज्या रूपाचा नकरा सरला हो
दागिनं माजं घरदार तुमचं, सावकारानं न्हेलं !  ।। २ ।।

आता इचार ठरला बरं का,
बऱ्या बोलानं बाजूला सरका
सरकाराचा हुकूम घेवून, डॉक्टर साहेब आलं. ।। ३ ।।



## ६८ जरा धीर धरा ( आंधळा मारतो डोळा )

अजून अंगाची हळद निघाली नाही
किती कामात आडवं येताय ठाई ठाई
डोळं मोठं करून त्या बघत्यात सासुबाई
बाई, न् किती कराल घाई जरा धीर धरा ॥ धृ ॥

भर मांडवात मंडळ भरलं
तुमी तिथं बा कमाल केली
टाचा वरती करून मला पाहिलं
चार चौघात फजिती झाली
भटजीला मंतर आठवना
अन् हसाया लागली सारी
अन् कारभारी ... ... ... ॥ १ ॥


धार काढताना चोरून येता
डाव्या डोळ्याचा इशारा करून
लागीगोडीत खुनवून मला,
भरली कासंडी हिसकून घेता
चलचल म्हणता कोन्यामधी
पर मामंजी बसलेत घरामंदी
दिल्या शब्दाला जागा
देव-धर्माला धरून वागा
कारभारी........... ॥ २ ॥

पहिल्या रातीचा म्होतर
माझ्या कानात सांगा
तवर घोड्याचा लगाम खेचा
खोडसाळ दिसताय भारी
कारभारी........

## ६९ नखरेवाली (एकटा जीव सदाशिव)

नग चालूस दुडक्या चाली,
जीव होतोय वरती खाली,
बोल हसून थोडं गाली,
तू छत्तीस नखरे वाली ।। धृ ।।

तुझा ढवळा शालू गं,
तुझी काळी काचोळी
तुझ्या गाली गाजार,
तुझा डोळा मासोळी,
कुरळ्या कुरळ्या केसामंदी
फुलानं इणली जाळी, ।। १ ।।



तुझी नजर तिरपी ग
तुझ्या पायात फिरकी ग
तुझ्या अवती भवतीनं
मन घेतय गिरकी ग,
डमरुवानी कंबर हलता,
मदन वाजवी टाळी, ।। २ ।।

काय सजनो मागावं,
किती मागं लागावं,
सांग कसं मी करावं,
किती राती जागावं,
सपना मधली रंभा माझ्या ।।३।।

□ □ □

# ७० दिवा बारीक करा ( कार्तिकी )

रंगमहाली झगमगाट हा, खरंच नाही बरा,
राजा जरा दिवा बारीक करा ॥ धृ ॥

टचटचली मधाळ ज्वानी.
आले न्हाऊन गुलाबपानी,
शिनगाराच्या सुरईमधनं, खुशाल पेला भरा ॥ १ ॥

रात लबाड हाय वर का
हित कुनी न आपला-परका,
उजेड असूनी जवळ घेता, न्यारीच तुमची तरा ॥ २ ॥

कसं समजून सांगू बाई,
अंदाराला भेदभाव न्हाई,
डोळं मिटूनी, उरला सुरला, डाव होऊदे पुरा ॥ ३ ॥



## ७१ रुतला भाला (भोळी भावडी)

महालात मैफिलीच्या मी चांदरात झाले
भरल्या उभार अंगी, शृंगार-साज ल्याले
प्यालयातल्या नशेचा, डोळ्यात रंग ओला !
तिरकी नजर निशाणी, रुतला उरात भाला ।। धृ ।।

हे फुल कुस्करावं, गालावरी गुलाबी,
पिळूनी वघा व्हटानं, हे पोवळं शराबी,
विळखा करून हाती, कानात गूज बोला ।। १ ।।

देते विडा खुनेचा, खावा धनी खुशालऽ
रंगेल पोपटाची होईल चोच लालऽ
पिंजऱ्यात काळजाच्या मैनेस साद घाला ।। २ ।।

मध्यान रात झाली, नाचात रंगले मी
जाईल तोल माझा, धुंदीत जागले मी
कुनी सावरून घ्या हो, हातात फूल झेला ।। ३ ।।

□ □ □

## ७२ फुलराणी (भोळी भाबडी)

तुम्ही रानदांडगं, नाजूक मी फुलराणी,
ही रीत कशाची, पिसाट येड्यावानी,
जाऊ कशी, न्हाऊ कशी, समजाऊ कशी......
अग बाई, बाई, बाई, बाई च् च् च्...आ ऽ ऽ ऽ
कळ लई आली दाबू नका.
अलगद हळूवार सख्या करा शिणगार
कमळाच्या फुलासंग झोंबू नका ।। धृ ।।

छपरी पलंग सजला नवा,
आत गुलाबी उबदार हवा,
अत्तराचा लावा फाया, दर्वळू दे माजी काया,
वाळ्याचं पानी लई फेकू नका ।। १ ।।

मान टेकीन छातीवरती
अंगी अंगी उठंल शिरशिरी
शेजेवरी निजवावं, घडीभरी लाजवावं
नमनात रात सारी जागवू नका ।। २ ।।

भल्या पाटंच घरी जातानं ऽ
दार ओढूनी घ्या बेतानं
जाता जाता वाटेवरी, अडवून घडीभरी
इचारलं कुनी तर लाजू नका ।। ३ ।।

□ □ □

## ७३ राणी (धाकटी बहीण)

शेर : राग सोडा सोडा हो रुसवा,
लाडे लाडे तुमच्या शेजारी राणीला बसवा,
पंचरंगी पान मी करते
आदबीनं तुम्हापुढं धरते !
हातामधी मोगऱ्याचा, गजरा बांधतें ।। धृ ।।

सोळा साज ल्याले अंगी, नजर झाली धुंद,
कमरपट्टा कचला बाई, रुतला बाजूबंद
अशी नाचून नाचून तुमची मर्जी राखते ।। १ ।।
हो हो, गजरा बांधते....

किती घेवू गिरकी आता, किती वाकू खाली
न्याहाळून तुमचा मुखडा, नशा मला आली
बसा मंचकी मंचकी, तुमच्यासाठी जागते ।। २ ।।
हो हो, गजरा बांधते......

इष्कबाजी खेळायला काळवेळ नाही,
महालात शृंगाराच्या बरी नसे घाई,
लुटा रंग हा, रंग हा अर्ध्या रात्री सांगते ।। ३ ।।
हो हो, गजरा बांधते......

□ □ □

## ७४ पावनं तुमी बरंच दिसताय की (मुरळी मल्हारी रायाची)

इष्काच्या दरबारी उभी नटून उर्वशी,
शिणगार लुटाया जमतिल येडी पिशी,
कैकांची खुशी पर कितीक पडले फशी,
अहो तरन्यांचं ठिक हाय, म्हाताऱ्यांचं काम काय,
गालात हसताय की, पावनं तुमी बरंच दिसताय की ।। ध्रृ ।।

सोंग काढून अशी मला भुलवू नका.
जरा ऐन्यात बघा, वय देईल धोका,
रंग ढंग करा पर सबुरीनं जरा, अहो फुडंच बसताय की, ।।१।।

नका पाळत धरू माझ्या रुपावरी,
डाका दरोड्याची, रीत न्हाई बरी,
रंगाच्या महालात चोरून रातोरात, वळंच घुसताय की, ।। २ ।।

अवती-भवती बगा, जाळं पसरंल कुनी,
सोवा होईल जगी, आता म्हातारपनी,
नको नको म्हनता, टकटक बघता, काळजात ठसताय की, ।।३।।



## ७५ रोमा-रोमात भरली लाज (दाम करी काम)

मी सात सुरांची राणी, रंगली गाणी गळ्यामधी आज
रोमारोमांत भरली लाज,रोमारोमात भरली लाज ।।ध्रृ।।

अंगाअंगावरी बाग आली फुलून
आज माझ्यावरी मीच गेले भुलून
मदमस्त मयुरी जशी,अशी उर्वशी ल्याले मी साज ।। १ ।।

काल भेटीतूनी प्रीत जडली कशी
स्वप्न जागेपणी झोप उडाली कशी
ही चाहूल आली कुठून, जराशी उठून घेते अंदाज ।। २ ।।

काय जादू घडे, काय झाली कला,
नाचू गाऊ किती जीव वेडावला,
मी बावरले चंचला, सुचेना बाई कामाला ।। ३ ।।

□ □ □

# ७६ इष्काचा तिडा (अंगाई)

कवळा हरभरा आला भराला, जपून नखानं खुडा
राया तुम्हा इष्काचा टाकते तिडा ॥ धृ ॥

काळ्या मातीचा सावळा रंग
उभ्या पिकाचा न्यारा ढंग
आंबट हिरव्या वासावरती नाग काढू दे फडा ॥ १ ॥

टचटचून हरभरा भरला
पानापानात नखरा शिरला
बांधावरती बसून कशाला उगीच मारता खडा ॥ २ ॥

अशा उबीत इपरीत घडलं
जाळीजाळीत दहीवर पडलं
वारा झोंबतो, झाडावरनं-मोत्याचा पडला सडा ॥ ३ ॥



## ७७ मदनाची शीळ (अशीच एक रात्र)

अंगाअंगात हुडहुडी भरली
शीळ मदनाची कानात शिरली ।। धृ ।।

नव्यानवतीचं सुटलं कोडं
आलं डवरून आंब्याचं झाड
पानापानात लपलाय पाड
त्याच्या भारानं फांदी झुकली ।। १ ।।

झरा गातोय झुळझुळ गाणी
लई रंगात आलंय पानी
झाला शिरकावा रानोरानी
दरीदरीची हिरवळ भिजली ।। २ ।।

जीव पिसाट सुसाट झाला
काय करावा सुचना चाळा
मासा जाळ्यात आपसूक आला
चैन नाही झोप कशी उडाली ।। ३ ।।



## ७८ लाईन (अशीच एक रात्र)

अहो, धरा धरा हो पकडा त्याला बिलकुल सोडू नका,
तुम्ही त्याला बिलकुल सोडू नका,
लाईन मारतोय बघा,
माझ्यावर लाईन मारतोय बघा ॥ ध्रु ॥

बाजारी जाता चौकात बसतो,
नजर रोखूनी गालात हसतो,
हटकून त्याला जाब इचारता,
तोंडाचा करतोय फुगा ॥ १ ॥

लक्षात ह्येच समजत न्हाई
बापय असून दिसतोय बाई,
अंगात खोड्या हातपाय काड्या,
हिर्प्याचा घालतोय झगा ॥ २ ॥

घरात बसूनी वैताग आला,
भाईर पडायचा जुलूम झाला,
तक्रार कसली, सारीच असली,
बाईला देत्यात दगा ॥ ३ ॥

□ □ □

## ७९ पिंगा (पुढारी)

पहिली : लई तुडुंब भरलंय आज इष्काचं तळ,
दुसरी : नाचती मधोमध दोन कमळाची फुलं,
पहिली : मधाला भुलतोय मागं म्होरं झुलतोय,
भवतीनं घालतोय पिंगा,
आला आला ग.

दुसरी : कोण ?

पहिली : आला ग चावट भुंगा,

दोघी : भवतीनं घालतोय पिंगा, ।। धृ ।।

पहिली : लई दिसानं नजर ही फिरली,
दुसरी : यवढ्या गर्दीत मलाच हेरली,
पहिली : अहो छेडाछेडी करतो, पदराला धरतो,
झोंबतो गोऱ्या अंगा, ।। १ ।।

पहिली : थरथरून काया भिजली
दुसरी : कवळ्या ज्वानीनं पिरती सजली,
पहिली : अहो उसासा भरते, आर्जव करते,
मदनाचा चाललाय दंगा ।। २ ।।

पहिली : पाकळ्या मिटून घेते गुलाबी
दुसरी : रात जतरंची होईल शराबी,
पहिली : पहाटचा फटका, कैद्याची सुटका,
भेटीचा कळला इंगा,



## ८० चोरी (पुढारी)

पहिली : अग बाई, बाई, बाई चोरी झाली ग
चोरी झाली

दुसरी : कशी झाली, कुटं झाली, कदी झाली,
साग की गं

पहिली : चौसोपी वाड्यात एकली मी,
त्यात धाकली मी,
हात धरला गं द्वाडानं धरला,
चोर पावलानं घरात शिरला, ।। धृ ।।

करंद काळचा अंधारानं गिळलं रातीला,
खांबाला मी टेकून बसले, सावली सोबतीला,
रातकिड्यांनी सूर लाविता, धडका उरी भरला ।। १ ।।

नीज उडाली चैन पडेना लपले कोन्यात,
खिडकीमधनं आलं कोणी दिसलं ऐन्यात.
हातपाय गळलं, बोबडी वळली जीव लई घाबरला ।।२।।

रात उलटली, कळलं न्हाई, उठले पहाटेला,
काळीज चोरून चोर पळाला कोनच्या वाटंला.
काय करू गं, शोधू कुठं मी, जाऊ कशी घरला. ।। ३ ।।

□ □ □

## ८१ घेराव ( करावं तसं भरावं )

ज्वानीच्या पान्यात मासोळी मी
पर वैताग आनलाय वगळचांनी
मला घेराव घातलाय सगळचांनी ॥ धृ. ॥

खाली कशी जाऊ वर कशी येऊ,
गिरकी मारू की फिरकी घेऊ,
मला भवतीनं येडलंय जाळचानी. ॥ १ ॥

शिळ कुनी घालतंय खाकरून ग.
टकमक वघते मी बावरून ग.
मला खानाखुना करत्यात डोळचानी. ॥ २ ॥

आकडचाचा गळ कुणी टाकाल का,
आनि इष्काच्या टोपलीत झाकाल का,
आज चळवळ केलीया कोळचांनी, ॥ ३ ॥




## ८२ इष्काचं पाखरू ( करावं तसं भरावं )

काळजाचं डोळं, मदनाचं जाळं,
त्यात इष्काचं पाखरू फसलंय ग
अन् टकामका बघत बसलंय ग ।। धृ ।।

तिळ काळा नि मुखडा गोरा,
शिरला पदरात पिसाट वारा,
उराला झोका, वाढलाय ठोका,
मनात कोनतरी ठसलय ग ।। १ ।।

केला शिनगार केला साज,
अंगी अंगी बहरली लाज,
ज्वानीत म्हाले, लेणं मी ल्याले,
कमरंला कायतरी कचलंय गं ।। २ ।।



माझ्या मागं ही दुनिया फिरती,
पर माजी तुमावर पिरती,
विळखा घाला, लाडे लाडे बोला,
काळजाला काळीज डसलंय गं ।। ३।।


□ □ □

## ८३ काळजाचं घड्याळ (करावं तसं भरावं)

कोरस : टिक्, टिक्, टिक्, टिक्, टिक्, टिक्.
तुझ्या काळजाच्या घड्याळ्यात किती वाजलं,
बाई किती वाजलं ?
ती : काय सांगू रातीचं बारा वाजलं ! ॥ धृ ॥

झाली मध्यान रात ग बाई,
अजून रायाचा पत्त्या न्हाई,
वारा बी मेला फिरकना अन्,
घामानं अंग माजं लई भिजलं ॥ १ ॥

काटा सरकत जाई फुडं,
डाव्या डोळ्याची पापणी उडं,
दारं खिडक्या बंद असूनी,
कोन्यात कोनतरी कुजबुजलं ॥ २ ॥



चोर कोन्यात होता उभा,
त्यानं माज्यावर धरला दबा,
भिऊन सख्याला मिठी मारली,
बघून त्याला माज डोळं लाजलं ॥३॥

□ □ □

## ८४ आसरा (पांच रंगाची पांच पाखरं)

पाच रंगाची पाच पाखरं
भिरभिर फिरती गगनात
अन् उतरली तुमच्या अंगणात
द्यावा आसरा, द्यावा आसरा
द्यावा आसरा घरट्यामधी ॥ धृ ॥

सुरत सावळी जवानी कवळी
डोळात घुमतोच पारवा
मोर लई भुलला, उबवूनी धरला
पिसारा निळसर हिरवा,
रस्ता चुकता शोधत फिरता
आले ह्या इष्काच्या रानात
अन् उतरली तुमच्या अंगणात
द्यावा आसरा, द्यावा आसरा
द्यावा आसरा घरट्यामधी ॥ १ ॥

मदनाच्या पाण्यात बघते मी ऐन्यात
राजहंसाची छबी,
आंब्याला आला पाड ग,
तिथं पालाच्या आड ग
नखरेल मैना उभी,
तानेवर तान तिचं उडालं भान
सूरतालाच्या फिरते रिंगनात
अन् उतरली तुमच्या अंगणात
द्यावा आसरा, द्यावा आसरा
द्यावा आसरा घरट्यामधी ॥ २ ॥

कुहूकुहू गाणी कोकीळ राणी
आली तुम्हाला रिझवाया
सात सुरांची सात रंगाची
पिचकारी भरूनी भिजवाया
गावकरी तुमचं, जिवलग आमुचं,
येवून छेडतोय सपनात
अन उतरली तुमच्या अंगणात !

□

□

□

□

□

□ □ □




## ८६ इष्काचा खोडा (पाच रंगाची पाच पाखरं)

छन्नन छुम, ता थै तक थै
तालात नाचते तोडा,
तुला इष्काचा घालते खोडा रं
तुला इष्काचा घालते खोडा
ता थै तक थै तालात नाचते तोडा ॥ धृ ॥

घाट बोलु दे घुंगरू संग,
ताल सुरांचा उधळू रंग,
सोडा समाधी होवू दे भंग,
असं उपरणं घेऊन तुमचं, ह्या पदराला जोडा ॥ १ ॥

अशी मेनकाबी नाचली होती,
विश्वामित्राची भुलली मती,
तुमची आमची मग काय गती,
ह्या मदनाच्या राऊंडामधनं, चौखुर सुटू दे घोडा ॥ २ ॥

सती पार्वती भिल्लीण झाली,
चालत आली मोराच्या चाली,
भोळाशंकर हसला गाली,
देव घसरला तरी भक्तानं, धीर धरावा थोडा ॥ ३ ॥



## ८७ मुक्काम (आई उदे ग अंबाबाई)

सोन्याचा दिवस आला, रात्र चांदीची आली,
पहिल्याच मुजऱ्याला भेट अचानक झाली,
आता ऐका जरा,
आज मुक्काम करा पाव्हणं मुक्काम करा ॥ धृ ॥

भरल्या बाजारी मी, आले नटून थटून,
पहिल्या भेटीत गेली, बाई ओळख पटून,
बघा मुखड्याकडं तुम्ही आठवण धरा,
आज मुक्काम करा, पाव्हणं मुक्काम करा ॥ १ ॥

झाले बेचैन मी, झाले गोरी मोरी,
खरं बोलायची, आज झाली चोरी,
तुम्ही सांगाल तशी, रोज दावीन तऱ्हा,
आज मुक्काम करा, पाव्हणं मुक्काम करा ॥ २ ॥

फूल उंबराचं हे, आज आलंय फुलून,
काय सेवा करू, हात हाती धरून,
तुमच्या फेट्यात मी, मस्त खवते तुरा,
आज मुक्काम करा, पाव्हणं मुक्काम करा ॥ ३ ॥



## ८८ नवरा

लगीन सराई आली ग बाई,
रंग लुटाया छेडा छेडीचा
नवरा हवा ग मला जोडीचा. ।। धृ. ।।

सुरत फाकडी बांधा अटकर
ओठ हासरं, डोळं गहिरं,
रूपानं इंद्र ग, तेजानं चंद्र ग,
बोलण्यात लई लाडीगोडीचा. ।। १ ।।

साडी जरीची गडद जांभळी,
वर ऐन्याची चोळी काचोळी,
वाघिणीला वाघ, नागिणीला नाग ग,
लाखात एक माझ्या निवडीचा. ।। २ ।।

वरिस औंदाच लइ धोक्याचं,
लाज आपली भय परक्याचं,
पुनवेची रात ग, उसळती लाट ग,
तोल जाईल माझ्या होडीचा. ।। ३ ।।

□ □ □

## ८९ राया

करि दिवसाची रात, माझी सोडना वाट,
याच्या डोक्यात अक्कल पिकवा,
कुणी माझ्या रायाला शाणपण शिकवा. ॥ धृ ॥

आड वाटेनं हेरतो मला,
तऱ्हेतऱ्हेची करतो कला,
कुणी रायाचा रस्ता चुकवा ॥ १ ॥

किती किती सवाल याचं घेऊ,
किती किती जबाब मी देऊ,
बोल बोलून आला थकवा, ॥ २ ॥

नाही इचार मनात दूसरा,
याच्या गाडीला लागलाय घसरा,
लाल कंदील याला कुणी दाखवा ॥ ३ ॥



## १० दिवाळी

दिल्लीचा सोदा, पुण्याचा भामटा
मुंबईचा म्हणत्यात मवाली,
राया रोज मुंबईला दिवाळी ॥ धृ ॥

इथं झरा चांदीचा, धूर निघे सोन्याचा,
वर पाऊस पडतो भुरूभुरू नाण्याचा,
आपल्या मनाचा जो तो राजा,
मजेत ख्याली खुशाली. ॥ १ ॥

त्या रंगमहाली रंगपंचमी उडे,
इष्काच्या घडचाला नजर मारते खडे,
जुगलबंदी ही तालसुरांची,
गजल संपता कवाली. ॥ २ ॥

हे तरुणपणाचं वारं येडं खुळं,
भुलशील साजना दिपून जातील डोळं,
दिस रातीचा भेद कळना,
सांज उगवते सकाळी. ॥ ३ ॥



## ९१ बेधुंद (बायांनो नवरे सांभाळा)

बेछूट बेभान, बेधुंद झाले मी,
सुदबुद कसली न्हाई,
सुदबुद कसली न्हाई,
ग पायी माझ्या घुंगरू, घुंगरू की वाजत्यात पायी ॥ धृ ॥

माझ्या ज्वानीना जाग आली ग,
अंगाअंगाची आग झाली ग,
निराळ्या ढंगात, रंगात आले मी, इष्काची फुटली लाहो ॥१॥

रंगमहालात आलाय सजणा ग
चांदरातीचा जावई पावणा ग
जरासं बेतानं हातानं धरा की, कशाला एवढी घाई ॥ २ ॥

ह्या शिणगाराला आली भरती हो
राया तुम्हावरी केली पिरती हो
गुलाबी मिठीत, दिठीत अशी मी, कळना मला बी काई ॥ ३ ॥



## १२ किमया (बायांनो नवरे सांभाळा)

आज किमया कशी, झाले वेडी वेडी पिशी,
जीव धुंदीत आसवला,
सूर माजा मला गावला ॥ धृ ॥

होते भोळी खुळी, दरी डोंगरामधी,
उन्हातान्हात ग, वाई फिरते किती
आज माळावरी अमृताच्या सरी,
वास दाही दिशी धावला ॥ १ ॥

आस होती नवी, माज्या उरातली,
ठाव नव्हती जादु सात सुरातली,
माया मुकली तरी, वाट चुकली तरी,
आज रस्ता कुनी दावला ॥ २ ॥

रानवेलीवरी, कळी आली फुलून,
जणू सपनामधी गानं आलं जुळून
तार छेडू कशी, पूजा मांडू कशी
आज देवानं लळा लावला ॥ ३ ॥

□ □ □

## ९३ बिजली ( बायानो नवरे सांभाळा )

ठिणग्यांचं बांधूनी चाळ, उडविते जाळ,
नार ही अग्निफुलानं सजली,
मी हो इष्काची कडकड बिजली ।। धृ ।।

आया बायांची अब्रू लुटतोया,
लचकं तोडून लांडगा, सुटतोया,
अशा डागन्या देईन त्याला, किडक्या सापाला,
कशी ग त्याची नजर बुजली ।। १ ।।

लाच खाऊचा बाजार काळा ग
आन मवाली वरनं भोळा ग,
अशी खनून काढीन माती, दुनिया ही खोटी
पापाची पाळमुळं रुजली ।। २ ।।



मी जाळुन काढीन पापाला
न्हाइ भिनार कुनाच्या बापाला,
थयथयाट करतो असा, जीव झाला पिसा
काया ही मस्तीनं मुसमुसली ।। ३ ।।

जगी सैतान करती करनी ही,
आन गरीब लागती झुरनी ही,
त्याच हातान नरडं धरीन,
रांगोळी करीन
अजून ही आग न्हाई विझली ।। ४ ।।

□ □ □

## ९४ साजणी ( पिंजरा )

गऽ ऽ ऽसाजणी
कुण्या गावाची, कोनच्या नावाची,
कुण्या राजाची, तू ग राणी,
आली ठुमकत, नार लचकत, मान मुरडत
हिरव्या रानी ।। धृ. ।।

खुळू खुळू घुंगराच्या...तालावर झाली दंग,
शालू बुट्टेदार...लई लई धाला तंग,
सोसना भार...घामाघूम झालं अंग,
गोऱ्या रंगाची, न्याऱ्या ढंगाची,
चोळी भिंगाची ऐन्यावानी,
आली ठुमकत, नार लचकत, मान मुरडत
हिरव्या रानी ।। १ ।।

डाळींबाचं दाणं तुज्या...पिळलं ग व्हटावरी,
गुलाबाचं फुल तुज्या...चुरडलं गालावरी,
कबुतर येडं खुळं...फिरतंय भिरी भिरी,
तुज्या नादानं, झालो बेभान,
जीव हैरान येड्यावानी,
आली ठुमकत नार लचकत मान मुरडत,
हिरव्या रानी ।। २ ।।

कवळ्यात घेऊनिया...अलगद उचलाव
मऊ मऊ हिरवळीत...धैवरात भिजवावं
पिरतीचं बेनं तुज्या.. काळजात रुजवावं
लाडी गोडीनं पुढल्या ओढीनं
राहू जोडीनं राजारानी
आली ठुमकत नार लचकत मान मुरडत
हिरव्या रानी ।। ३ ।।

## ९५ ज्वानीची बाग (भक्त पुंडलीक)

टंच भरलाय मदनाचा घाटा
अंगा अंगात फिरती लाटा ॥ धृ. ॥

हा उभार बांधा माझा
तू जिवाचा जिवलग राजा
विळखा घालूनी जवळी घे ना
शृंगार तरणा ताठा ॥ १ ॥

उर होतोय वरती खाली
जसा पारवा रिंगण घरी
मिठी मारता गुदमरले मी ।
सर्रकन आला काटा ॥ २ ॥

बाग ज्वानीची आली फुलून,
असा एकांत आला जुळून,
डोळ्याला हे भिडले डोळे
ओठ लागु द्या ओठा ॥ ३ ॥




## ९६ भरती ( भक्त पुंडलिक )

शेर : राजबिंड रूप हे, चिरेबंद हा वाडा,
मीठ मोहऱ्यांनी ग, दृष्ट कुणीतरी काढा
ही सुरत साजरी बघून आलें मो लाडा,
झाले कुर्बान मी तुजवरती, सख्या तुजवरती
कशी सांगू तुला आज इष्काला आली भरती
आज इष्काला आली भरती ।। धृ ।।

टपोरं डोळं तेजाळ ऽऽ
त्यात उतरलं आभाळ ऽऽ
हात पसरूनी भेटायला,
आतुर झाली धरती ।। १ ।।

पेलेदार या छातीवरती
मान टेकते घडीभरी
मोर पिसांचे हात रेशमी
तुझ्या अंगावर फिरती ।। २ ।।

सुरत सुखाची धुंदी रे,
सोडू नको ही संधी रे,
परकेपण हे सोडा देवा
किती करू आरती ।। ३ ।।



## ९७ गोरीमोरी ( चंदनाची चोळी अंग अंग जाळी)

हिरवा शालू हिरवी चोळी,
हिरवा चुडा मी ल्याले,
लाज लाजुनी मी, गोरी गोरी झाले ।। धृ ।।

जोडीनं बसता लग्नाला,
मांडी लागली मांडीला,
चटकन त्यांनी चिमटा काढला,
बावरून मी गेले ।। १ ।।

होमाभवती फिरताना,
हात हाता मधी धरताना
गचकन त्यांनी हात दाबला
भलतेच केले चाळे ।। २ ।।

पहिल्या राती मी रंगात,
चंदनाची चोळी अंगात,
गपकन त्यांनी मिठी मारता,
शिनगारात मी न्हाले,

रंग खेळता हातानं,
विडा तोडता दातानं,
कचकन त्यांनी ओठ चावला,
अंग शहारून आले, ।। ३ ।।

□ □ □



# ९८ चंदनाची चोळी (चंदनाची चोळी अंग अंग जाळी)

उरी आग पेटली विरहाची, लावला लेप चंदनी,
राग रूसवा सोडा, सोडा अबोला धनी,
चांदनं असून कशी, रात काळी काळी,
चंदनाची चोळी माझं अंग अंग जाळी ।। धृ ।।

सांगा जाऊ कुठं, सांगा न्हाऊ कुठं,
सांगा तुमच्याविना, जीव लाऊ कुटं,
आज येकलेपनी, दुनिया झाली सुनी,
उभ्या आगीत मी, जशी जळते कळी ।। १ ।।

वाट बघते अशी, थाट करते अशी,
रूप न्याहाळायला, ऐना धरते अशी,
त्यात तुमची छबी, म्होरं न्हाते उभी,
जाते बावरून मी, नार भोळी खुळी ।। २ ।।

राया जागू किती, झुरनी लागू किती,
रंग महालात ह्या, सजा भोगू किती,
मला छेडतो मदन, दूर गेला सजन,
बाई आली कशी, ताटातुटी भाळी ।। ३ ।।




## ९९ फुंकर (चंदनाची चोळी अंग अंग चाळी)

ऐन उन्हाळा कडका होता, वळीव आला भरून,
वांधावरनं होते निघाले, हात आडवा धरून,
वावटळीनं बेजार केलं, असा धिंगाना करून,
माज्या डोळ्यात कचरा गेला,
कुनी येऊन फुंकर घाला ॥ धृ ॥

दिवसा ढवळ्या धुरळा उडला,
डावा डोळा मी अपसुक मिटला,
भलताच त्यानं अर्थ काढला,
येगळा इशारा केला ॥ १ ॥

मर्द गडी पर दिसला छकडा,
हसून पिळला मिशीचा आकडा,
दोनी हातानं धरला मुखडा,
कसंच झालं मला ॥ २ ॥

लई जोरानं त्यानं फुकलं,
व्हटावरी व्हट त्याचं झुकलं
त्याचं बी चुकलं, माझं बी चुकलं,
गडवड घोटाळा झाला. ॥ ३ ॥



## १०० चावटपणा ( चंदनाची चोळी अंग अंग जाळी )

तो : अग नारी तुजा नखरा, न किती मारू चकरा,
वग तरी माज्याकडं ऽ
कसं सांगू तुला ग जीव झाला खुळा,
नि काळीज धडधड उडं ऽ ।।

ती : जाता येता रोज रोज बगतोस, आज काय दिसलं नवं,
तुला रं, आज काय दिसलं नवं ?

तो : कालच्या पातुर अंदार होता, आज लई लागल्यात दिवं,
नारी गं आज लई लागल्यात दिवं !

ती : अग, काय गं म्हणतोय ह्यो ?

तो : अग पेरूच्या बागेत फिरत होतीस परकर घालून कशी ?
अन् आज आंब्यांच्या वनात आलीस लुगडं नेसून अशी ?

ती : भलं भलं आलं, त्यांचं हित काय चालं
कुणाकुणाला दिला न्हाई थारा.
लाडी गोडी नको, अशी छेडाछेडी नको
आता तुजं बी वाजतील बारा,
शीळ काय घालतय, गोंडा काय घोळतय,
काय काय करतय खानाखुना, करतय खानाखुना ऽ
बरा न्हवं ह्यो चावटपणा रं,
बरा न्हवं ह्यो चावटपणा ।। धृ. ।।

कोरस : कोन दिल्लीच्या सोदा, का पुण्याचा भामटा,
का मुंबईचा मवाली, कोन हाईस तू सांग, सांग, सांग,

तो : जरा वाऱ्यानं, वाऱ्यानं उडला पदर ऽ
हृया मेल्याची, मेल्याची तिरकी नजर,
आवो मागनं येऊन हळूच म्हनतंय
मैतर हाय मी जुना,
बरा नवं हृयो चावटपणा ॥ १ ॥

पाठमोरी, पाठमोरी झाले मी अशी गं,
पाठमोरी, पाठमोरी झाले मी अशी गं
हृयाची खालवर, खालवर झाली मिशी गं
डाव्या दंडाला धक्का मारून
फिदी फिदी हसतय पुन्हा
बरा न्हवं हृयो चावटपणा ॥ २ ॥

जशी म्हवराची, म्हवराची फळं ही झाली
तशी अंगात, अंगात उभारी आली
बघता बघता जवानी फुलली
काय हृयो माजा गुना ?
बरा न्हवं हृयो चावटपना ॥ ३ ॥




## १०२ ठिनगी ( चंदनाची चोळी अंग अंग जाळी )

चवलीन् पावली, चिल्लर खुर्दा,
त्यातली न्हवं मी बरं का,
बंदा रुपया हाय ह्यो पावनं,
नाद छनाछन ऐका !
आता लाज येशीवर थडकली,
अन् ठिनगी इष्काची भडकली ॥ धृ ॥

मस्तीत अशी मी ठोकरली ही दुनिया,
माजं सपान होतं दिसलं गुलाबी किमया,
हमरस्त्याला काटं म्हनुनी,
वाट वाकडी हुडकली. ॥ १ ॥

बेभान अशी मी झाले येडी पिशी,
उरात आग जळते, ही मदनाची खुशी,
त्या आगीवर गरम गुलाबी,
हवा येऊनी थडकली ॥ २ ॥

पिसाट मन माजं, सुसाट मी गुलछडी,
नाचत उडविते, विजलीची फुलछडी,
शिनगाराच्या आतषबाजीनं
उभार ज्वानी तडकली ॥ ३ ॥



## १०३ ज्वानी (झुंज)

रंगपंचमी आली, रंगबाजाचा रंग हाय् !
टचटचून भरलं मुसमुसतंय अंग
येत्यात जात्यात लांब लांब न्हात्यात
मीच माझ्यामधी दंग
पिचकारी भरून कुनी यावं, शिपनं खेळावं
आता ! आर ये, काय बगतोस परक्यावानी
भरभरुन आली ज्वानी
सातरंगात, न्याऱ्या ढंगात आता इष्काचं उडूदे पानी,
गुलाबी पानी ये ये ये येडचा अय ।। धृ ।।

उभारी अशी भार ह्यो सोसंना
किती मागं मी, लागु रं साजना
अशी एकलीच जागु किती, डोळ्याला डोळा लागना,
मिठी घालुनी हसून बोलना
घरात जाऊनी आत मंचकी देते नजराना
मन पिसाट झाले मदमस्त लुटून
घे खानी रुपाच्या खानी ।। १ ।।

गरम ही हवा, त्यो दिवा घालवा,
चांदरातीला, प्रीतीला चाळवा
अशा दवात भिजवा कळी पाकळी अलगद ही फुलवा !
एक सुरात, एक तालात रोमारोमात घुमवा
गावा रातीची गानी ये ये ये येडचा अय ।। २ ।।

□ □ □


## १०४ इष्काचं जाळं ( नाव मोठं लक्षण खोटं )

शेर : ज्वानीचं जंगल, मदनाची झाडं, वाऱ्यानं पानं थरथरली,
खट्याळ पारवा, राघू हिरवा, मस्तीनं पंखं भिरभिली !
अशी गरम हवा.......... (हाय हाय)
असा वसला थवा........ (अग बग)
एक पाखरू मनात हेरलंय गं
त्याला इष्काच्या जाळ्यात धरलाय ग ॥ धृ ॥

हे पाखरू हाय लई तरनं,
कस रुपानं देखनं न चिकन्,
अचूक दिसलं म्होर माज्या
नजरत भरलंय ग ॥ १ ॥

मला बगून त्याची खुषी
ह्या पाखराला खेळवू कशी,
हमरस्त्याला सोडून येऊ
हिकडंच फिरलंय ग ! ॥ २ ॥

डाव्या डोळ्याच्या इशाऱ्या वरती,
त्याला घायाळ करीन पुरती,
काळजाच्या ह्या घरट्यामंदी
ठेवायचं ठरलंय ग ! ॥ ३ ॥



## १०५ दरोडा (फरारी)

सोळाशे रुपयाची तिजोरी होती भारी,
आत ठेचून भरली इष्काची दौलत प्यारी,
नवं कुलूप लावून पहारा करती सारी,
ज्वानीचा खजिना लुटून नेला
चमत्कार घडला अग बाई, बाई, बाई,
पडला दरोडा पडला ॥ धृ ॥

बाई एकलीच होते घरी,
थाप पडली ग दारावरी,
अग कडी काढता त्याचा डोळा
डोळ्यावरती भिडला ॥ १ ॥

झोंबाझोंबीत सरली रात,
का द्वाडानं केला घात,
होता नव्हता तो ऐवज त्यानं
डोळ्यादेखत लुटला ॥ २ ॥

कुठं कुणाची तक्रार करू,
कुणा कुणाला सांगत फिरू,
दुनियेवरचा इस्वास बाई
माझा मला नडला ॥ ३ ॥

□ □ □

## १०६ ठसा (फरारी)

काय झालं ते समजत नाही, कुठं गेले मी काल,
भल्या पहाटला तोंड धुताना दुखू लागला गाल,
मुखडा हातात लपवू कसा
ग बाई गालावर उठला ठसा ।। धृ ।।

पिवळी नितळ उभार काया,
जरीपदराला अत्तर फाया.
त्यानं येऊन अंदाज घेऊन–
डाव टाकला असा ।। १ ।।

जवळी घेता सुदबुद हरली,
सळसळ बिजली अंगी शिरली,
त्याला मी हेरलं, मला बगुन तो
झाला येडा पिसा ।। २ ।।

मिठीत गेले कळलं न्हाई,
कसा कुठं तो निघून जाई,
जपलं तरी बी डाग लागला
चंद्राला भर दिसा ।। ३ ।।

□ □ □

## १०७ चुडा (फरारी)

लई दिस माझ्या मनात होतं कुणीतरी यावं,
आपली म्हणूनी जीव लावूनी जवळ मला घ्यावं,
तुमच्या नावाने भरते चुडा
राया माझ्या अंगठीत वसवा खडा ॥ धृ ॥

दिवा झुंबरात अलगद लावा धनी,
रंगमहालात तिसरं नाही कुणी,
सोनचाफ्याच्या शेजेवरती
उधळा अत्तर सडा. ॥ १ ॥

तुम्हा बघून माझी झाली खुषी,
कुरवाळा हातानं ज्वानी अशी,
तुमच्या हातानं एकांताचा
व्हटात रंगला विडा. ॥ २ ॥

कसं सांगू मी मन लई भोळं,
खुळ्या पिरतीला नसती डोळं,
तुमच्या संगती गिरवीन राया
इष्क बाजीचा धडा ॥ ३ ॥



## १०८ चाहूल (फरारी)

सपनात साजनाची चाहुल आज आली
हुरहुर आज माझी का आसवात न्हाली
परक्यावानीं धनी असं पाहू नका
जीव लावून असा जीव घेऊ नका ॥ धृ ॥

घ्यावं न्याहळून मला पटवा खाणाखुणा
नव्या रुपानं हयो धागा जुळला जुना
कावरं बावरं असं, तुम्ही होऊ नका ॥ १ ॥

जरा आठवा सख्या झाल्या भेटी किती
प्रीत केली कशी हात धरूनी हाती
आता काळजावरी पाय ठेवू नका ॥ २ ॥

आज दिसला तुम्ही धीर आला मला
देवा आपल्या घरी मला घेऊन चला
पाठ फिरवून अशी दूर जावू नका ॥ ३ ॥

□ □ □

## १०९ मदन (फरारी)

तरुणपणाच्या तळ्यांत फुलली कमळं दोन कशी
एक रंभा एक उर्वशी ।। धृ ।।

केवड्याचा रंग बाई अंगावर ल्याले
चांदण्याची साडी आज नेसुनिया आले
वाऱ्यावरती झुलता झुलता
मस्तीला आली खुशी ।। १ ।।

उरी चोळीची रुतली गाठ
पडला पदर उघडी पाठ
गर्दीमधनं उठून दिसते
ढगात चांदणी जशी ।। २ ।।

अंगासंग रंगाची ग जमली गट्टी
कटीखाली झुलली किनारीची पट्टी
हृया ईष्काच्या जाळ्यामंदी
मदन पडला फशी ।। ३ ।।

□ □ □

## ११० भिंगरी (भिंगरी)

येईल त्याची फिरकी घेऊन
माज्यावानी कुनि न्हाई दुसरी
गरा, गरा, गरा, गरा, गरा, गरा
भिंगरी ग, फिरते भिंगरी. ।।धृ.।।

अहो माजी पिरती खुळी,
त्याची घुंगरं मी बांदली,
नाचनाचूनी त्या चाळाची,
उडविन ठिकरी, ठिकरी ।। १ ।।

लाज कशाची आता धरू,
खेळ इष्काचा झाला सुरू,
शिणगाराचा सुरुंग भरला
भिरभिरणाऱ्या पदरी ।। २ ।।

मी तोडून आले बंध,
माजं जीणं आता बेधुंद,
खुशाल आता करा इशारा
डंख मारूनी लहरी ।। ३ ।।

□ □ □

# १११ मनधरनी (झिंगरी)

नका करू कुणी माजी मनधरनी
आहा–नार नखऱ्याची मी तरनी ॥ धृ ॥

कशाला करता खानाखुना
इशारा आता ह्यो झाला जुना
डाळ न्हाई शिजायची, गोंडा घोळूनी ॥ १ ॥

इष्काच्या पुंगीला भुलायची न्हाई
नागीन होऊन डुलायची न्हाई
डंख अशी मारीन नेम धरूनी ॥ २ ॥

धुंदीला, मस्तीला आवरू किती
रेशमी पदर सावरु किती
किती जन लागल्यात जीव झुरनी ॥ ३ ॥

डोळ्याला येगळं लागलं पिसं
बगावं तिकडं साजण दिसं
त्यानं बाई माज्यावर केली करनी ॥ ४ ॥



## ११२ काटा (भिगरी)

आडवाटनं जाता जाता
तोल माजा सुटला
गोऱ्या गोऱ्या टाचतं काटा रुतला ।। ध्रृ. ।।

सरसरून कळ ही आली,
डोळं मिटलं नि बसले खाली,
दात रोविता व्हटावर मी
घाम अंगी फुटला ।। १ ।।

आलं रगात लाले लाल,
कशी चालले मी तिरकी चाल,
उसासं देता धागा चोळीचा
नको तितं तुटला. ।। २ ।।

कुनि येऊन सावरा मला,
काटा काढायची दावा कला,
कुना कुनाला सांगा माजा
इशारा ह्यो पटला ।। ३ ।।

□ □ □


## ११३ जादू (असला नवरा नको ग बाई)

ही कशानं धुंदी आली ! ॥ ध्रृ ॥
काय समजना, काय उमजना
हचो चांद नभी, ही पुनव उभी
रेशमी धुक्यानं न्हाली !
ओ ऽऽओ ऽऽ ॥ ध्रृ ॥

ही कशानं धुंदी आली
किरनांचा पिसारा फुलतो रं
जीव अंतराळी हा झुलतो रं
मन हुरहुरलं, का बावरलं ही कशाची जादू झाली ॥ १॥

ही कुजबुज चालं कसली,
ही पानं खुदुखुदु हसली,
लाडी गोडी बगून, छेडाछेडी बगून,
चांद लबाड हसतो गाली ॥ २ ॥

लई टिपुर टिपुर ही रात अशी,
आली पिरतीचं गानं गात जशी
दोनी डोळं मिटून, आज आली कुटून
मला गुलाबी कोडं घाली ॥ ३ ॥



## ११४ साजण (भैरू पैलवान की जय)

लई दिसानं सजणा आला ग
लई दिसानं साजण आला
कुटं कुटं मी ठेऊ त्याला ग
लई दिसानं साजण आला ।। ध्रृ ।।

भेट अशीच होती घडली,
तवा धरनं ही नाती जडली,
प्रीत माजी मला ही नडली हो
केला डोळ्यानं नाजुक चाळा ग ।। १ ।।

आज सपनाच्या रंगमहाली,
शेज कळ्या फुलांची केली,
काया लाजंमंदी ही न्हाली हो
जीव भेटीला कसा बाई भ्याला ग ।। २ ।।

सखा घालील रेशीम विळखा,
मी लाजून मारिन मुरका,
दृष्ट लागल अशी ही घटका,
सूर तालात मिसळून गेला ग ।। ३ ।।



# ११५ भैरू पैलवान की जय ( भैरू पैलवानकी जय )

मी हो लाडाची—लाडाची मैना
डाव्या डोळ्याचा दावीन ऐना ।। धृ ।।

मला राघूचं लागलय पिसं,
माज्या मनगटी येऊन बसं,
त्याला न्हचाळू किती, हाक घालू किती,
रूप बगून काळजात माइना ।। १ ।।

डौल राघूचा हिरवा गार,
झोका घेतोय मागं म्होरं,
विठू विठू करून, लाल चोचीत धरून
माज्या पदराची केली दैना ।। २ ।।

किती नाचू मी ह्याच्या फुडं,
उर भितीनं खालवर उडं,
कसा बगतोय वळून, कुठं जाऊ पळून,
त्याच्या वाचून जीव ह्यो न्हाइना ।। ३ ।।



 भैरू पैलवान की जय 

2823
23090
काव्य

किती सभाव तुमचा साधा
किती कराल दौलत जादा
तुमी बरमचारी, कुंवारीण मी
कशात सांगा नडलं ?
मन जडलं तुम्हावर जडलं ॥ धृ ॥

हजारातूनी उठून दिसतो रुबाब तुमचा बाई,
भीम म्हनू का म्हनू मारुती, तुमाला उपमा न्हाई,
इंद्रदेवाच्या बागेमधलं फूल कुनी हे खुडलं ? ॥ १ ॥

फिदा तुमावर अदा करून मी कबुतरागत डुलते,
कमरपट्टयाला लचकं मारूनी उमर सोळाची झुलते
पदरामंदी तरुणपनाचं, गुपीत माजं दडलं ॥ २ ॥

कदर कराया नजर बांदुनी, खुशाल खिळवा डोळं,
हात सुटलं पर पाय अडकतो, असं इष्काचं जाळं,
गुमान आता कोडं सोडवा, सपान कुनाला पडलं ॥ ३ ॥



REFBK-0023018